




# गोदातीर समाचार

RNI No.6331/62
REGD.NO. G2/RNP/NND-27/2024-2026

संपादक : केशव घोणसे पाटील
www.godateer.com








* वर्ष ६५ वे * अंक ७९ * नांदेड * बुधवार, दि. २५ मार्च २०२६ * पृष्ठे ६ * किंमत २ रुपये ☎: 255777, Fax :252211


# अखेर बारामती विमान दुर्घटनेबाबत गुन्हा दाखल

## रोहित पवारांच्या लढ्याला कर्नाटकातून यश



**पुणे (प्रतिनिधी)–** राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार रोहित पवार याच्या लढ्याला अखेर यश आलं असून बारामतीमधील अजित पवार यांच्या विमान दुर्घटनेप्रकरणी अखेर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

बारामती विमानतळाजवळ झालेल्या लियरजेट ४५ विमान दुर्घटनेप्रकरणी कर्नाटकच्या बंगळुरू येथील शेशाद्रीपुरम पोलीस ठाण्यात अखेर गुन्हा दाखल करण्यात आला. या दुर्घटनेमागे मोठा गुन्हेगारी कट असल्याचा गंभीर आरोप तक्रारीत करण्यात आला आहे. विशेष म्हणजे मंगळवारीच रोहित पवार यांनी विधानसभेत हा मुद्दा उपस्थित केला होता. नागपुरात बस स्टॉपवरुन चार्जर चोरीला गेली म्हणून गुन्हा दाखल झाला, 'चप्पल चोरीला गेली म्हणून गुन्हा दाखल झाला. 'अंगणात झाडाच्या फांद्या आल्या म्हणून गुन्हा दाखल झाला, मात्र अजित दादांसंदर्भात गुन्हा दाखल झाला नाही, 'ज्याचं जळतं त्यालाच कळतं, असेही रोहित पवार यांनी म्हटले होते.

अजित पवार प्रवास करत असेले मुंबईहून बारामतीकडे येणारे व्हीटी-एसएसके नोंदणी असलेले बॉम्बार्डियर लियरजेट ४५ विमान २८ जानेवारी २०२६ रोजी सकाळी सुमारे ८.४३ ते ८.४५ वाजण्याच्या सुमारास कोसळले. हे विमान व्हीएसआर व्हेंचर्स प्रायव्हेट लिमिटेड कंपनीद्वारे चालवले जात होते. या दुर्घटनेत विमानातील सर्व पाच जणांचा मृत्यू झाला. मृतांमध्ये त्या वेळचे महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांचाही समावेश होता. या प्रकरणी मृत अजित पवार यांचे पुतणे रोहित पवार यांनी भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ च्या कलम १७३(१) अंतर्गत 'झिरो एफआयआर' म्हणून तक्रार दाखल केली आहे. यापूर्वी त्यांनी २५ फेब्रुवारी रोजी मुंबईतील मरीन ड्राईव्ह पोलीस ठाणे तसेच २६ फेब्रुवारी रोजी बारामती पोलीस ठाण्यात संपर्क साधला होता. मात्र, गुन्हा नोंदवण्यात आला नव्हता. त्यानंतर पुणे सीआयडीकडून केवळ अपघाती मृत्यू अहवालाच्या दृष्टीने तपास सुरू असल्याचे सांगण्यात आले होते.

## नराधम भोंदूबाबावर ८ गुन्हे दाखल, देवेंद्र फडणवीसांची सभागृहात माहिती

**मुंबई (प्रतिनिधी)–** आपण दैवी अवतार असल्याचं सांगत अशोक खरातने महिलांचे शोषण केलं, महिलांना तीर्थाच्या नावाखाली लघवी पाजली. या प्रकरणात एकूण आठ गुन्हे दाखल असून अशोक खरातला ज्यांनी कुणी मदत केली त्या कुणालाही सोडण्यात येणार नाही, अशी ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली.

अशोक खरात प्रकरणात आरोपीने महिलेचे फोटो व्हायरल करण्याची धमकी देत पाच कोटी मागितले होते. या प्रकरणात नाशिक पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. १८ फेब्रुवारी २०२६ रोजी नीरज जाधव याने एआय फोटो व्हायरल केला नंतर डिलीट केला. त्यामुळे संबंधित महिलेला नीरज जाधवच्या विरोधात पुरावा देता आला नाही. परंतु या प्रकरणातील पीडित महिलांना विश्वासात घेऊन, त्यांचे समुपदेशन करून, कोणतीही ओळख सार्वजनिक न करता गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. या प्रकरणात एसआयटीची स्थापना करण्यात आली आहे. त्या माध्यमातून तपास सुरू आहे.

# युद्धाचा परिणाम दीर्घ काळापर्यंत राहणार; साठेबाजांवर कडक कारवाई करा

## पंतप्रधान नरेंद्र मोदींचं राज्यसभेत निवेदन

**नवी दिल्ली (प्रतिनिधी)–** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पश्चिम आशियात अमेरिका-इस्त्रायल आणि इराण यांच्यात सुरु असलेल्या युद्धावर राज्यसभेत सविस्तर निवेदन केलं. मोदी यांनी होर्मुझच्या सामुद्रधुनीत जहाजांवर अडकलेल्या भारतीय नौदलाच्या जवानांबाबत चिंता व्यक्त केली. नरेंद्र मोदी यांनी तेल आणि गॅसचचा पुरवठा निश्चित करण्यासाठी मेड इन इंडिया जहाजे आणि स्टोरेजच्या मजबुतीसंदर्भात रोडमॅप जारी करत राज्य सरकारांना साठेबाजी रोखण्याचे आदेश दिले आहेत.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी युद्धामुळं निर्माण झालेल्या स्थितीचा फायदा उठवणाऱ्या काळा बाजार आणि साठेबाजी करणाऱ्यांविरोधात कडक करावाई करण्याचे निर्देश राज्य सरकारांना दिले आहेत. राज्य सरकारांनी पहिल्यांदा आवश्यक वस्तूंचं सातत्यानं नियंत्रण करावं आणि दुसरं म्हणजे जिथून साठेबाजीच्या तक्रारी मिळतील तिथं तातडीनं कारवाई करावी, असं मोदींनी म्हटलं. संकटाच्या काळात जनतेला महागाईपासून वाचवणं सरकारची प्राथमिकता असावी, असं मोदी म्हणाले.

पश्चिम आशियात सुरु असलेल्या युद्धामुळं झालेलं नुकसान भरुन काढण्यास जगाला खूप काळ लागेल, असं मोदी म्हणाले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी यावेळी भारतीय अर्थव्यवस्थेवर विश्वास दर्शवला. आपले आर्थिक आधार खूप मजबूत आहेत. युद्धाच्या अल्पकालीन आणि दीर्घकालीन परिणांपासून वाचण्यासाठी एक मंत्रिगट स्थापन केल्याचं मोदी म्हणाले. सरकार एलपीजीसह पीएनजीच्या वापराला देखील प्राधान्य देत असल्याचं मोदी म्हणाले.

पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले की भारताकडे क्रूड ऑईलचा पुरेसा साठा आहे. गेल्या ११ वर्षात ५.३ मिलियन मेट्रिक टन पेट्रोलियम रिझर्व्ह तयार करण्यात आलं आहे. भारत पहिल्यांदा ऊर्जा साधनांच्या पूर्ततेसाठी २७ देशांवर अवलंबून होता, आता त्याची संख्या वाढवून ४१ देश करण्यात आली आहे.

नरेंद्र मोदी यांनी पश्चिम आशियात सुरु असलेल्या युद्धाला तीन आठवडे पूर्ण झाले आहेत, असं सांगितलं. यामुळं संपूर्ण जगात गंभीर ऊर्जा संकट निर्माण झालं आहे, याचा परिणाम भारतावर देखील झाला आहे, असं मोदींनी म्हटलं. आखाती देशांमध्ये जवळपास १ कोटी भारतीय राहतात, तिथं काम करतात, त्यांच्या जीवनाचं संरक्षण करणं देखील भारतासाठी चिंतेचा विषय आहे, असं मोदींनी म्हटलं आहे.

होर्मुझच्या सामुद्रधुनीत जहाजं मोठ्या प्रमाणात अडकली आहेत. ज्यात क्रू मेंबर्स मोठ्या प्रमाणात भारतीय आहेत. हा भारतासाठी चिंतेचा विषय आहे. या स्थितीत राज्य सभेतून जगभरात संवाद गरजेचा असल्याचा संदेश देऊया असं मोदी म्हणाले.

# राष्ट्रीय महामार्गावरील अतिक्रमण बुलडोझरने हटवले

## आठ दिवसांत आसना ते अर्धापूर तालुक्याची हद्द अतिक्रमणमुक्त करू- राष्ट्रीय महामार्ग अधिकारी




**अर्धापूर (प्रतिनिधी)–** नांदेड-नागपूर राष्ट्रीय महामार्गावरील वाढती अपघातांची मालिका व वाहतुकीला अडथळा येऊ नये यासाठी राष्ट्रीय महामार्ग प्रशासनाने अतिक्रमण हटाव मोहीम बुलडोझर लावून सुरू केली आहे. पुढील आठ दिवसांत आसना ते अर्धापूर तालुक्याची हद्द अतिक्रमणमुक्त करणार असल्याचे राष्ट्रीय महामार्ग अधिकाऱ्यांकडून सांगण्यात आले.

अर्धापूर तालुक्यातील हिंगोली जिल्हा हद्द ते आसना नदीपर्यंत राष्ट्रीय मार्गावरील सर्व अतिक्रमणे, अवैध होर्डिंग्ज, पार्किंग व अनाधिकृत दुकाने हटवण्यासाठी बुलडोझर लावून अतिक्रमण हटविण्यास सुरुवात केली होती. दि. २४ मार्च रोजी अतिक्रमण काढले की, उद्या जैसे थे परिस्थिती होत असल्याने राष्ट्रीय महामार्गाच्या अधिकाऱ्यांनी फिरते पथक स्थापन करून अतिक्रमण होणार नाही, याची दक्षता घेत आहे. हिवरा पाटीवरील अंबाई फॅमिली हॉटेलला बुलडोझर लावून अतिक्रमण काढले आहे. राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाच्या अधिकाऱ्यांनी अतिक्रमण हटाव विशेष मोहीम हाती घेत पोलीस बंदोबस्तात अतिक्रमण हटविण्यास सुरुवात केली आहे. राष्ट्रीय महामार्गावरील अतिक्रमण हटाव मोहीम पोलीस बंदोबस्तात सुरू राहणार असल्याची माहिती राष्ट्रीय महामार्गाच्या अधिकाऱ्यांनी दिली आहे. राष्ट्रीय महामार्गावरील अतिक्रमण हटविण्यासाठी पोलीस निरीक्षक चंद्रशेखर कदम यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. राष्ट्रीय महामार्गाच्या अधिकाऱ्यांनी सूचना न देता अंबाई फॅमिली हॉटेलला बुलडोजर लावून मोडतोड करून मोठ्या प्रमाणात नुकसान केल्याचा आरोप हॉटेल मालकाने यावेळी केला आहे.

## अन्य धर्म स्वीकारल्यास एससी-एसटी दर्जा होणार रद्द; सर्वोच्च न्यायालय

**नवी दिल्ली (प्रतिनिधी)–** सर्वोच्च न्यायालयाने एससी-एसटी अधिनियमासंदर्भात आज, मंगळवार २४ मार्च रोजी मोठा निर्णय दिला आहे. न्यायालयाने स्पष्ट केले की, जो व्यक्ती हिंदू, शीख किंवा बौद्ध धर्मापेक्षा वेगळा धर्म स्वीकारतो, त्याला अनुसूचित जातीचे सदस्य मानले जाणार नाही.

यासंदर्भात सर्वोच्च न्यायालयाने सांगितले की, अन्य धर्म स्वीकारल्यास अनुसूचित जातीचा दर्जा तत्काळ आणि पूर्णपणे संपतो. जस्टिस पी. के. मिश्रा आणि जस्टिस एन. व्ही. अंजारिया यांच्या खंडपीठाने हे ठरवले की, धर्मांतर केल्याने एससी दर्जा संपतो. कोर्टाने नमूद केले की, संविधान (अनुसूचित जाती) आदेश, १९५० मध्ये ही बाब स्पष्ट करण्यात आली आहे आणि या आदेशाअंतर्गत लागू केलेली अट पूर्णपणे वैध आहे. १९५० च्या आदेशातील कलम ३ मध्ये नमूद धर्मांशिवाय कोणताही धर्म स्वीकारल्यास जन्मानुसार अनुसूचित जातीचा दर्जा तत्काळ संपतो, असे न्यायालयाने सांगितले.

# नांदेड जिल्ह्यासाठी आज येलो अलर्ट

**नांदेड (प्रतिनिधी)–** प्रादेशिक हवामानशास्त्र केंद्र, मुंबई यांनी दि. २४ मार्च रोजी दिलेल्या सूचनेनुसार नांदेड जिल्ह्यासाठी दि. २५ मार्च २०२६ रोजी येलो अलर्ट जारी केलेला आहे. दि. २५ मार्च २०२६ रोजी जिल्ह्यात तुरळक ठिकाणी ताशी ४० ते ५० किमी वेगाने वादळी वारे वाहण्याची, विजेच्या कडकडाटासह व ढगांच्या गडगडाटासह मध्यम स्वरूपाचा पाऊस पडण्याची अधिक शक्यता वर्तविली आहे.

**या गोष्टी करा :** विजेच्या गडगडाटासह पावसाची पूर्वकल्पना असल्यास बाहेर जाणे टाळा. जर मोकळ्या जागेत असाल आणि जवळपास कुठल्याही सुरक्षित इमारतीचा आसरा नसेल तर सखल जागेत जाऊन गुडघ्यात डोके घालून बसा. आकाशात



विजा चमकत असल्यास घरात किंवा सुरक्षित इमारतीत आश्रय घ्या. घराच्या बाल्कनी, छत अथवा घराबाहेरील ओट्यावर थांबू नका. आपण घरात असाल आणि घरातील विद्युत उपकरणे चालू असतील तर त्या वस्तू त्वरित बंद करा.तारांचे कुंपण, विजेचे खांब व इतर लोखंडी वस्तूंपासून दूर रहा. पाण्यात उभे असाल तर तात्काळ पाण्यातून बाहेर पडा.

**या गोष्टी करु नका:** आकाशात विजा चमकत असल्यास घरातील लँडलाईन फोनचा वापर करू नका. शॉवरखाली अंघोळ करू नका. घरातील बेसिनचे नळ, पाण्याची पाईपलाइन यांना स्पर्श करू नका तसेच कुठल्याही विद्युत उपकरणांचा वापर करू नका.

विजेच्या गडगडाटासह वादळी वारे चालू असताना लोखंडी धातूच्या सहाय्याने उभारलेल्या तंबूमध्ये किंवा शेडमध्ये आसरा घेऊ नका.उंच झाडाच्या खाली आसरा घेऊ नका. धातूंच्या उंच मनोऱ्याजवळ उभे टाकू नका.जर आपण घरात असाल तर उघड्या दारातून अथवा खिडकीतून वीज पडताना पाहू नका. हे बाहेर थांबण्याइतकेच धोकादायक आहे.

## विरेंद्रसिंघ गाडीवाले दुसऱ्यांदा स्थायी समिती सभापतीपदी विराजमान



**नांदेड (प्रतिनिधी)–** महापालिकेच्या स्थायी समिती सभापतीपदी भाजपचे नगरसेवक विरेंद्रसिंघ गाडीवाले यांची मंगळवारी बिनविरोध निवड करण्यात आली.

स्थायी समिती सभागृहात सभापती पदाच्या निवडीसाठी जिल्हाधिकारी तथा पिठासीन अधिकारी राहुल कर्डिले यांच्या अध्यक्षतेखाली महत्वपूर्ण बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीला आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे, अतिरिक्त आयुक्त गिरीश कदम, नगरसचिव अजितपालसिंघ संधू उपस्थित होते.

स्थायी समितीच्या सभापतीपदासाठी भाजपकडून विरेंद्रसिंघ गाडीवाले यांनी अर्ज दाखल केला होता. गाडीवाले यांचा एकमेव अर्ज **(पान ३ वर...)**

## डॉ.समीर कदम यांच्यावर लिंबगाव येथे अंत्यसंस्कार

**नांदेड (प्रतिनिधी)–** एमजीएमच्या संस्थापक आणि विश्वस्त कुटूंबातील सदस्य तथा नवी मुंबई येथील एमजीएम रूग्णालयातील सर्जन आणि एमजीएम वैद्यकीय महाविद्यालयाचे जनरल सर्जरी विद्याशाखेचे विभाग प्रमुख डॉ. समीर सुधीरचंद्र कदम यांचे दि. २२ मार्च रोजी निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर दि.२४ मार्च रोजी लिंबगाव ता.जि.नांदेड येथे महानुभव पंथाच्या परंपरेने अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी मुंबई येथून एअर ॲम्बुलन्सने नांदेड विमानतळावर डॉ.समीर यांचे पार्थिव आणल्यानंतर नांदेड येथील भाग्यनगर येथील निवासस्थानी अंत्यदर्शनासाठी ठेवले होते.



यावेळी डॉ.समीर यांच्या पत्नी डॉ. गायत्री कदम, मुलगा अभयसिंह कदम, वडील डॉ.सुधीरचंद्र कदम आणि मातोश्री, बंधु, वहिणी, पत्नी आणि पुत्र तसेच एमजीएमचे अध्यक्ष आणि डॉ.समीर यांचे चुलते माजी मंत्री कमलकिशोर कदम, सौ.लतिका कदम, एमजीएम विद्यापीठाचे कुलपती अंकुशराव कदम, सौ. अनुराधा कदम, विश्वस्त उज्वल कदम, डॉ.नितीन कदम आणि त्यांच्या सौभाग्यवती तसेच एमजीएमचे उपाध्यक्ष डॉ.पी.एम.जाधव, मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायमुर्ती रणजित भोसले, ॲड. एस.के.कदम, एमजीएम आरोग्य विद्यापीठाचे कुलगुरू शशांक दळवी, एमजीएम विद्यापीठाचे **(पान ३ वर...)**






# फटाकेयुक्त बुलेटच्या 'सायलेन्सर'वर पोलिसांनी फिरवला बुलडोझर

## पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांची उपस्थिती

**नांदेड (प्रतिनिधी)–** शहरात महापुरुषांच्या जयंतीनिमित्त काही तरुण उत्साहामध्ये येऊन आपला होश गमावत बुलेट व अन्य वाहनांच्या मूळ सायलेन्सरमध्ये बदल करून फटाकेयुक्त व कर्णकर्कश सायलेन्सर लावतात. अशा वाहनांविरुद्ध मागील काही दिवसांपासून वजिराबाद शहर वाहतूक शाखेची धरपकड मोहीम सुरू होती. यात जवळपास १०० सायलेन्सर जप्त करण्यात आले होते. मंगळवार, दि. २४ मार्च रोजी पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांच्या उपस्थितीत शहराच्या महावीर चौकात हे सर्व सायलेन्सर बुलडोझर फिरवून नष्ट करण्यात आले.

शहरामध्ये मागील काही दिवसांपासून दुचाकी वाहनांच्या सायलेन्सरमध्ये बदल करून फटाके फोडणारे आवाज आणि कर्णकर्कश आवाज करणारे सायलेन्सर बसविण्यात येत होते. त्यामुळे ध्वनी प्रदूषण आणि वायू प्रदूषण मोठ्या प्रमाणात होऊन नांदेडच्या शांततेला बाधा पोहोचल्या जात होती. शहर वाहतूक शाखेचे सहायक पोलीस निरीक्षक भागवत नागरगोजे व त्यांचे सहकारी पोलीस उपनिरीक्षक सरदार कोटीतीर्थवाले, अजय साकळे, नव्हाते, पोलीस अंमलदार केंद्रे, सोनटक्के, आर. आर. घाडगे, वाघमारे व आदी कर्मचाऱ्यांनी कारवाया करून बुलेट व अन्य दुचाकी वाहनाला बदल करून लावण्यात आलेले सायलेन्सर जप्त करण्यात आले होते. जप्त केलेले सायलेन्सर वरिष्ठांच्या आदेशावरून महावीर चौक परिसरात नष्ट करण्यात आले.




रामनवमीनिमीत शहरात दुचाकी रॅलीचे आयोजन करण्यात आले असून या रॅलीमध्ये दुचाकींच्या मूळ सायलेन्सरमध्ये बदल केल्यास व फटाकेयुक्त किंवा कर्णकर्कश आवाज येणारे सायलेन्सर बसविल्यास शहर वाहतूक शाखेच्यावतीने संबंधित वाहनांविरुद्ध जागेवरच कारवाई करून वाहन जप्त करण्यात येईल. त्यामुळे दुचाकी रॅलीमध्ये सहभागी होणाऱ्या वाहनांच्या सायलेन्सरमध्ये बदल करू नये व शहराच्या शांततेचा भंग करू नये असे आवाहन पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी केले आहे.

यावेळी पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार, उपविभागीय पोलीस अधिकारी (शहर) रामेश्वर व्यंजने, श्याम पानेगावकर, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक उदय खंडेराय, वजिराबाद ठाण्याचे पोलीस निरीक्षक परमेश्वर कदम यांची उपस्थिती होती.

## खाजगी कौशल्य विद्यापीठ सुधारणा विधेयक परिषदेत मंजूर

**मुंबई (प्रतिनिधी)–** राज्यातील कौशल्य विकास आणि रोजगारनिर्मितीला गती देण्यासाठी महत्त्वपूर्ण पाऊल उचलत खाजगी कौशल्य विद्यापीठ सुधारणा विधेयकाला विधान परिषदेत मंजुरी देण्यात आली.

या विधेयकाच्या माध्यमातून ग्रामीण भागातील रोजगाराच्या संधी वाढविण्यावर विशेष भर देण्यात आला आहे. नव्या युगातल्या अत्याधुनिक कौशल्याची गरज ओळखून नव्या विद्यापीठांना मान्यता देण्यात आल्याचे कौशल्य विकास मंत्री मंगलप्रभात लोढा यांनी विधान परिषदेत स्पष्ट केले. देशाचे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी युवकांना रोजगारक्षम बनवण्यासाठी देशभरात सुरु केलेली स्किल इंडिया योजना आतापर्यंत यशस्वीपणे राबवली जात आहे. याच धर्तीवर राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या दूरदर्शी नेतृत्वात कौशल्यपूर्ण आणि रोजगारक्षम महाराष्ट्र घडवण्याचं उदिष्ट ठेवण्यात आले असल्याचे मंत्री लोढा यांनी सांगितले.

जे जे आपणासी ठावे, ते ते इतरांसी सांगावे
शहाणे करूनी सोडावे, सकळ जन
संस्थापक संपादकः
कै. देविदासराव रसाळ
गोदातीर समाचार
संपादक
केशव घोणसे पाटील

# चित्रपटांतील देशभक्ती की बाजारपेठ?

अलीकडच्या काळात भारतीय चित्रपटसृष्टीत देशभक्तीवर आधारित चित्रपटांची एक वेगळीच लाट पाहायला मिळत आहे. युद्ध, गुप्त कारवाया, शौर्यगाथा आणि राष्ट्राभिमान यांसारख्या विषयांवर आधारित अनेक चित्रपट प्रेक्षकांच्या मनात स्थान मिळवत आहेत. याच पार्श्वभूमीवर प्रदर्शित झालेला 'धुरंदर' हा चित्रपट मोठ्या प्रमाणात गाजला आणि त्याने बॉक्स ऑफीसवर चांगली कमाईही केली. आता त्याचा दुसरा भाग, 'धुरंदर दोन', प्रेक्षकांसमोर आला आहे. पहिल्या भागाच्या यशामुळे दुसऱ्या भागाबद्दल उत्सुकता निर्माण झाली असली, तरी या निमित्ताने एक गंभीर प्रश्न उपस्थित होतो की, अशा चित्रपटांमधून खरोखरच देशभक्ती वाढते का, की ती केवळ भावनांचा वापर करून केलेली व्यावसायिक रणनीती असते? देशभक्ती हा विषय भारतीय समाजात अत्यंत संवेदनशील आणि भावनिक मानला जातो. देशासाठी बलिदान देणाऱ्या सैनिकांविषयी आदर, सीमारेषेवरील संघर्ष आणि राष्ट्रीय अभिमान याबद्दल सामान्य नागरिकांच्या मनात प्रचंड आदर असतो. चित्रपट निर्मातेही याच भावनेचा आधार घेत कथानक उभे करतात. मोठ्या प्रमाणावर ॲक्शन, प्रभावी संवाद आणि राष्ट्राभिमान जागवणारे प्रसंग दाखवून प्रेक्षकांच्या भावनांना स्पर्श करण्याचा प्रयत्न केला जातो. त्यामुळे असे चित्रपट अनेकदा मोठ्या प्रमाणावर लोकप्रिय होतात. मात्र, या लोकप्रियतेच्या मागे असलेले वास्तव समजून घेणेही तितकेच महत्त्वाचे आहे. चित्रपट हे मूलत: मनोरंजनाचे माध्यम आहे. कथानक प्रभावी करण्यासाठी त्यात नाट्यमयता, अतिशयोक्ती आणि काल्पनिक घटकांचा वापर केला जातो. त्यामुळे चित्रपटात दाखविलेल्या सर्व घटना अक्षरशः वास्तवाशी जुळतातच असे नाही. काही वेळा ऐतिहासिक किंवा समकालीन घटनांना आधार असला तरी त्यांचे सादरीकरण नाट्यमय पद्धतीने केले जाते. त्यामुळे प्रेक्षकांनी चित्रपटातील घटनांकडे पूर्ण सत्य म्हणून पाहणे योग्य ठरणार नाही. याच ठिकाणी समाजमाध्यमे आणि प्रचाराचा प्रभावही महत्त्वाचा ठरतो. एखादा चित्रपट प्रदर्शित होण्यापूर्वीच त्याभोवती मोठे वातावरण तयार केले जाते. ट्रेलर, मुलाखती, प्रचारमोहीम आणि सामाजिक माध्यमांवरील चर्चा यांमुळे चित्रपटाला देशभक्तीचा ठसा दिला जातो. परिणामी, अनेक प्रेक्षक त्या चित्रपटाकडे केवळ मनोरंजन म्हणून नव्हे, तर देशप्रेम व्यक्त करण्याच्या माध्यमासारखे पाहू लागतात. अशा परिस्थितीत चित्रपटाची व्यावसायिक बाजू अनेकदा दुर्लक्षित राहते. खरे तर देशभक्ती ही केवळ चित्रपट पाहून निर्माण होणारी भावना नाही. ती समाजातील जबाबदारीची जाणीव, प्रामाणिकपणा, कर्तव्यनिष्ठा आणि राष्ट्रहिताची भावना यांमधून विकसित होते. सैनिकांचे शौर्य, वैज्ञानिकांचे योगदान, शिक्षकांचे कार्य किंवा सामान्य नागरिकांचे प्रामाणिक प्रयत्न, या सर्वांचा एकत्रित परिणाम म्हणजे देशभक्तीची खरी जाणीव. त्यामुळे देशभक्तीचा अर्थ केवळ पडद्यावर दिसणाऱ्या नाट्यमय घटनांपुरता मर्यादित ठेवणे योग्य ठरणार नाही. याचा अर्थ असा नाही की, देशभक्तीवर आधारित चित्रपट अनावश्यक आहेत. उलट, योग्य पद्धतीने सादर केलेले चित्रपट समाजात सकारात्मक प्रेरणा निर्माण करू शकतात. अनेक चित्रपटांनी इतिहासातील विस्मरणात गेलेल्या घटना लोकांसमोर आणल्या आहेत. काही चित्रपटांनी सैनिकांचे त्याग आणि संघर्ष प्रभावीपणे मांडले आहेत. त्यामुळे या प्रकारच्या चित्रपटांचे महत्त्व नाकारता येणार नाही. मात्र, त्याकडे विवेकाने पाहणे आवश्यक आहे. विशेषतः 'धुरंदर'सारख्या चित्रपटांच्या संदर्भात हा प्रश्न अधिक महत्त्वाचा ठरतो. जर एखादा चित्रपट खऱ्या घटनांवर आधारित असल्याचा दावा करत असेल, तर त्या घटनांची तथ्यात्मकता तपासणेही गरजेचे आहे. अन्यथा काल्पनिक गोष्टींना वास्तवाचा रंग देऊन प्रेक्षकांच्या भावनांशी खेळण्याचा धोका निर्माण होतो. समाजातील संवेदनशील विषयांचा वापर करून केवळ आर्थिक लाभ मिळवणे हा उद्योगाचा उद्देश होऊ नये. या चित्रपटांमध्ये हिंदू समाजाबद्दल अपमानकारक विधान आहे, याचा निषेध तथाकथित हिंदुत्ववाद्यांनी अद्यापही केलेला नाही, हे आश्चर्य नाही का? चित्रपटसृष्टी ही मोठी आणि प्रभावशाली सांस्कृतिक शक्ती आहे. ती समाजाच्या विचारांवर आणि भावनांवर परिणाम करू शकते. त्यामुळे निर्माते, दिग्दर्शक आणि लेखक यांनी आपल्या सर्जनशील स्वातंत्र्यासोबत सामाजिक जबाबदारीची जाणीवही ठेवणे आवश्यक आहे. दुसरीकडे, प्रेक्षकांनीही विवेकबुद्धी वापरून चित्रपटाकडे पाहिले पाहिजे. आजच्या डिजिटल आणि माहितीच्या युगात कोणतीही गोष्ट तपासणे अवघड राहिलेले नाही. त्यामुळे एखाद्या चित्रपटातील घटना, त्यामागील इतिहास किंवा वास्तव याचा शोध घेणे सहज शक्य आहे. जर प्रेक्षकांनी सजग भूमिका घेतली, तर मनोरंजन आणि वास्तव यातील फरक ओळखणे सोपे जाईल. म्हणूनच 'धुरंदर' सारखे चित्रपट लोकप्रिय ठरणे स्वाभाविक आहे. परंतु अशा चित्रपटांच्या माध्यमातून खरोखरच देशभक्ती वाढते की ती केवळ भावनांचा उपयोग करून केलेली व्यावसायिक युक्ती असते, हा प्रश्न कायम राहतो. त्यामुळे या चित्रपटांकडे अंधानुकरणाने पाहण्याऐवजी विचारपूर्वक आणि समतोल दृष्टीकोनातून पाहणेच अधिक योग्य ठरेल.

# लोकमनाचा अभ्यास करणारे लोकशिक्षक संत गाडगेबाबा



गाडगेबाबांच्या कीर्तनात काठोकाठ प्रबोधन होते. तो प्रबोधनाचा अमृतकलशच होता. ज्याला तो समजला, उमजला आणि ज्याने तो पचविला. त्याला जीवनातील लाभ आणि हानी तेवढ्याच संयमाने स्वीकारण्याचे तंत्र समजले. तो कोणत्याही सुखाने हुरळून जाणार नाही आणि कोणत्याही संकटाने विचलीत होणार नाही. आजूबाजूला सुरू असलेल्या अनिष्ठ रुढी, परंपरा ज्याने समाजाची प्रचंड हानी होते. अंधश्रद्धा तर मनुष्यत्वातील माणूसपण दुबळे बनविते. दूरदृष्टी तर सोडाच मनुष्याला दृष्टीहिन बनविण्याचे सामर्थ्य ज्या प्रथेमध्ये आहे. त्या स्वीकारणे हेच धर्मकार्य असे समजून ते स्वीकारणाऱ्या तथाकथित सुशिक्षितांच्या अज्ञानाला नेमके काय म्हणावे? गाडगेबाबा अशा अर्धवटरावांना आपल्या कृतीतून यथायोग्य धडा द्यायचे.

असाच एक प्रसंग नाशिकच्या रामकुंडावरचा. गाडगेबाबा तिथून जाताना पिंडदानाचा पूजाविधी सुरु होता. केशवपण करुन चार भाऊ रांगेत बसले होते. गुरुजी सांगतील त्याप्रमाणे त्यांचा पूजा विधी सुरु होता. अगदीच शिस्तबद्ध वातावरणात. गाडगेबाबांकडून त्या पूजेचे सूक्ष्म निरीक्षण सुरु होते. पूजाविधी संस्कृतमधून सुरु होता. त्यामुळे कोणालाही काही समजण्याचा प्रश्न नव्हता. तो कोणाला काही समजण्यासाठी पूर्वीपासून आजपर्यंत कधीतरी होता का? आणि यानंतर असणार आहे का? या प्रश्नाचे उत्तर मी देण्याची गरज नाही. जगाला ज्याचा विचार करण्याची गरज नव्हती, त्याचा आवर्जून विचार केला पाहिजे असे गाडगेबाबांना मात्र वाटत होते. गुरुजी शेवटचे वाक्य मात्र मायबोलीत बोलत होते. रांगेत बसलेल्या चौघा भावांच्या वडिलांना ज्या वस्तू आवडत होत्या त्या सर्व वस्तू त्या ठिकाणी ठेवल्या होत्या. बाबांनी त्या पवित्र पूजेच्या मध्ये नको तो अवलक्षणी प्रवेश केला आणि ते कळवळून विनवणी करायला लागले. पूजा करणारे गुरुजी माह्या पोटात कावळे वरडायले. मले बम (खूप) भूक लागली हो महाराज. मले हेव निवद खाऊ द्या नं बापहो. गाडगेबाबाच्या बारा वर्षाच्या वनवासातील तो कालावधी असल्याने त्यांच्या अंगावरील विचित्र वेषामुळे ते भिकारी वाटतच होते. त्या गुरुजींचा क्रोधाग्नी भडकला. ते जोरात ओरडले. या पवित्र पूजेच्या मध्ये कशाला तडफडलास रे भिकारड्या. तो नैवेद्य नाही. याला पिंड म्हणतात पिंड. तुझ्यासारख्या भिकारड्याला ते कसे कळणार? आमच्या पवित्र पूजेत अडथळा नको. अरे तुझ्याशी मी एवढा वेळ का बोलतोय? तुझ्यासारख्या गलीच्छ माणसासोबत मी आणखी बोललो तर कावळा पिंडाला शिवणार नाही. अरे अनर्थ होईल रे शिं..च्या.. तू जा बरे येथून. गुरुजी पुरते वैतागून बोलत होते.

गाडगेबाबा परत प्रश्नाची सरबती करत होते. ती कायची पिंड हाय. शंकराची पिंड हाय का ती महाराज. त्यावर महाराज उर्फ गुरुजींचे उत्तर, अरे वेड्या हे समोरचे चौघे भाऊ आहेत ना, त्यांचे वडील स्वर्गवासी झालेत. त्यांच्या आत्म्यास शांती मिळावी यासाठी हा पूजाविधी सुरु आहे. पण तुला काय त्याचे. फक्त पोटपूजा करण्यासाठी नुसता बोंबलत फिरतोस. जा इथून पुढे कुठेतरी. तिकडे तुझी इच्छापूर्ती होईल.

हा सर्व सोवळ्यातला संवाद आपल्याला काहीच कळाला नाही. असे वेड्याचे सोंग घेवून बाबा पुढे बोलतात. काहो गुरुजी महाराज, यायचा बुढा तिकडं सर्गात (स्वर्गात) अन् त्याह्यले अथून (इथून) तेव निवद कसा काय पाठवता? मले तं परस्न (प्रश्न) पडला. सर्गात हेव निवद पोहचील कसा काय बाप्पा? कायले ह्या भानगडी करत बसता हो गुरुजी. तुम्ही सगये मिळून एक इच्चार करा, अन् तेवं निवद मलेच देऊन टाका ना. लयच पोटात काव...काव...करुन राह्यलं ना राजे-हो. पूजेत बसलेले चार भाऊ खूपच वैतागले होते. त्यांचा संताप त्यांच्या चेहऱ्यावरील वळवळीवरुन स्पष्ट जाणवत होता. त्याचे चळवळीत रुपांतर होण्यापूर्वी गाडगेबाबांनी तिथून प्रस्थान करावे, असे भाव त्यांच्या चेहऱ्यावर स्पष्ट जाणवत होते. मंत्र महात्म्य गुरुजी सांगतच होते.

या मंत्राच्या बडबडीनं काय होतं बाप्पा ? गाडगेबाबांचा प्रतिप्रश्न. अरे मूर्खा, या मंत्रोच्चाराने हे पिंड यांच्या वडिलांना पोहचणार? ते प्रसन्न होऊन यांना आशीर्वाद देतीलं. गुरुजी महाराज. अहो काय म्हणता गुरुजी? तुमच्या या मंत्रानं हे पिंड सरळ सर्गात पोचते? काय कमाल हाये बाप्पा! हेव सर्ग काय जवडे (जवळ) हाये का? - गाडगेबाबा

अरे मूर्खा, तुझी अक्कल नाही पोहचणार तिथपर्यंत. स्वर्गात पोहचण्यासाठी तेवढी भाग्यरेषा बळकट असावी लागेल की नाही? अरे तुम्ही नरकातले किडे, शेवटी कुठे वळवळणे तुमच्या नशिबी असेल? - गुरुजी

ममई इतका लांब हाय का सर्ग -गाडगेबाबा

अरे लाखो, करोडो मैल दूर आहे तो. गुरुजीमहाराज पुरते वैतागले होते.

महाराज काय चमत्कार करता बाप्पा, लाखो-करोडो मैल लांब असलेल्या सर्गात मंत्राच्या बळानं तथिसाक निवद् पाठवून देता. मले तं लय नवल वाटतंय तुमचं.

गाडगेबाबा मनाशी बोलत बोलत नदीत उतरले. आकाश दिशेला नमस्कार करुन देवाला साकडं घालू लागले. हे पांडुरंगा, हे पुजारी महाराज मंत्र म्हणताच त्याह्यचा नैवेद्य सर्गातले पित्र खातात. आता अथून मी फेकतो ते पाणी मह्या उमरावतीच्या शेताले जाऊ दे. असे म्हणून गोदा-वरीतील पाणी त्यांनी पुजारी आणि त्या चार मुलांच्या दिशेने फेकण्यास सुरुवात केली.

पुजारी उर्फ गुरुजी महाराज संतप्त झाले आणि जोरात ओरडले, अरे मूर्खा काय हा विचित्रपणा, त्यावर बाबा प्रसन्न मुद्रेने हसून म्हणाले, अहो देवा, हेव काही इचित्तरपणा नाही. मी अथून मह्या उमरावतीच्या शेताले पाणी देतो ना! त्यावर त्या पुजारी महाराजांचे उग्र स्वरुप पहावयास मिळाले. अरे शिं..च्या तुझी उमरावती कुठे? हे नाशिक कुठे? काही विचार केलास का? कसे पाणी पोहचणार तुझ्या शेतात? उपस्थित सर्व त्यांना वेडा समजून दात काढत होते. त्याचा काहीही परीणाम न होऊ देता. अगदी शांतपणे बाबा म्हणाले, अहो पुजारी महाराज आपल्या मंत्रानं जर लाखो, करोडो मैल स्वर्गात नैवद्य पोहचतो, तं माह्या शेतात चारशे मैलावर हे पाणी काऊन पोचणार नाही? एखाद्या निष्णांत वकीलास लाजवेल असा युक्तीवाद गाडगेबाबांनी केला होता. प्रमाणपत्र हस्तगत करुन स्वत:ची विद्वता घोषित करणाऱ्या कितीतरी विद्वानांना धूळ चारण्याची क्षमता या वैराग्य मूर्तीत होती.

त्यामुळेच बाबासाहेब आंबेडकरांसारखे जगप्रसिद्ध विद्वान गाडगेबाबांना मानत होते. गाडगेबाबावर सुद्धा बाबासाहेबांच्या विचारांचा खूप प्रभाव होता. कोणताही महत्वाचा निर्णय घेतांना दोघांनाही एकदुसऱ्याचा विचार महत्वाचा वाटत होता. त्यामुळेच धर्मांतर करतेवेळेस बाबासाहेबांना गाडगेबाबांशी संवाद साधने आवश्यक वाटले होते.

१४ ऑक्टोबर १९५६ ला नागपूरला आपल्या लाखो अनुयायांसोबत बाबासाहेबांनी बौद्ध धर्माची दीक्षा घेतली. ही बातमी गाडगेबाबांना कळताच त्यांच्या वाणीतून सहजस्फूर्त उद्गार बाहेर पडले. भारतात नवा सूर्य उगवला. हा सूर्य सामाजिक परिवर्तनातून समतेची क्रांतिदिशा निश्चित करणारा होता. पारंपरिक विचाराला भेदून मानवतेची नवी संकल्पना स्पष्ट करणारा होता. अमानवी आणि पाश्वी विचारावरचा तो विजय होता. प्रबोधनसूर्याने प्रज्ञासूर्याचा अत्यंत मोजक्या शब्दात गगनस्पर्श करणारा सन्मान केला होता. त्यांच्या नात्यात ज्ञान, सन्मान, राहणीमान, शिक्षण याचा कधीही अडसर आला नाही. विचाराचा समान धागा परस्परांना समजून घेण्यास पुरेसा होता. बाबासाहेब आंबेडकर गाडगेबाबांच्या कार्याविषयी बोलताना आपले मत व्यक्त करतात. गाडगेबाबांसारखे थोर संत आपल्या देशात झाले पाहिजे. त्यांचे मोठेपण लोक जाणत नाहीत. सर्व स्तरातील लोकांचे परिवर्तन करणारे विचार ते आपल्या कीर्तनातून मांडतात. लोकांचे मन, विचार बदलावे, अनिष्ठ रुढी, परंपरावर त्यांच्या कीर्तनातून होणारा प्रहार लोकांना परिवर्तनवादी विचार स्वीकारायला लावतो. त्यांना कोणाच्या धनाची, मानाची गरज नाही. त्यांना समाज परिवर्तनाचा विचार श्रेष्ठ वाटतो. ते खरे मानवधर्मी संत आहेत. यावरुन गाडगेबाबांविषयी त्यांच्या मनातील आदर स्पष्ट होतो. परस्परांच्या कार्याविषयी असणाऱ्या नितांत आदरामधूनच आपल्या समतावादी विचारांची वीण ते घट्ट करू शकले. बाबासाहेबांच्या कार्याचा आपल्या कीर्तनातून गाडगेबाबांनी सदैव गौरव केला. गाडगेबाबा आपल्या कीर्तनातून महापुरुषांच्या नावाचा जयघोष करत. मनमाड येथील कीर्तनात त्यांनी बाबासाहेबांच्या नावाचा जयघोष केला. लोकांच्या मनात जातीयतेचे विष पिढ्यांन्‌पिढ्यांपासून घट्ट बसलेले असल्याने उपस्थितांनी त्यांना प्रतिसाद दिला नाही. परिवर्तनवादी गाडगेबाबा प्रचंड अस्वस्थ झाले. बिघडलेले सामाजिक स्वास्थ्य सुधारले पाहिजे. हा एकच विचार त्यांच्या डोक्यात थैमान घालू लागला. कीर्तन संपल्यावर त्यांनी बाबासाहेबांचा सामाजिक संघर्ष आणि त्यांचे सामाजिक व राष्ट्रीय कार्य उलगडून सांगण्यास सुरुवात केली. सर्व वृतांत सांगून झाल्यावर बाबासाहेबांच्या नावाचा जयघोष केला. उपस्थितांनी त्यांना दिलेल्या प्रतिसादाने आसमंत दुमदुमून गेला. लोकांच्या मनातलं अज्ञानाचं मळभ दूर झालं. अंधकाराची जळमट दूर झाली. त्यांच्या प्रबोधनातून निर्माण झालेली ती परिवर्तनाची पहाट होती. ते दृष्य पाहून गाडगेबाबांच्या डोळ्यातून आनंदाश्रूचा पूर आला होता. लोकमनाचा अभ्यास करुन लोकमानस बदलवणाऱ्या लोकशिक्षकाच्या परीक्षेत ते यशस्वी झाले होते.

गोविंदा! त्यांच्या पोटचा गोळा. त्याचा दुर्दैवी अंत झाल्यावर बाबांनी खारेपाटनच्या कीर्तनात 'गेले किती कोट्यानुकोटी।' हा अभंग घेतला आणि आपल्या कौटुंबिक दु:खाला पूर्णविराम दिला होता. बाबासाहेब आंबेडकरांच्या महापरिनिर्वाणानंतर मात्र ते त्यांच्या भावनेचा बांध रोखू शकले नाही. आपल्या नेत्रातील गंगायमुनांना त्यांनी वाट मोकळी करुन दिली आणि ते म्हणाले, अजून काही दिस बाबासाहेब तुम्ही जगायले पाह्यजे होतं. लय काम शिल्लक राह्यले ना अजून. आता ते कोण पुढं नेईन? त्यांच्या निधनानंतर अवघ्या दोन आठवड्यात गाडगेबाबांनी हे जग सोडावे? हा केवळ योगायोग नाही. परस्परांबद्दल असलेले प्रेम, आदर, कार्यावरची निष्ठा, अंतकरणातून वाहणारा समविचारांचा प्रवाह या सर्व आंतरिक चक्राला बसणारा धक्का त्यातून स्पष्ट होतो. महापुरुषांच्या मानवी जीवनाचा भव्यतम अर्थ या विचारातून सामान्य माणसाला कळेल का?

**-प्रा. वसंत गिरी**
मेहकर, जि. बुलडाणा
मो. ९०११२२९२३२

# आरोग्य व्यवस्थापन प्रणालीचे सुयश!



इ. स. १८८२ साली डॉ. रॉबर्ट कॉक यांनी क्षयरोगाच्या जिवाणूंचा शोध लावला. त्यांचा प्रबंध जागतिक शास्त्रज्ञांच्या परिषदेत मांडला आणि त्याला दिनांक २४ मार्च रोजी मान्यता मिळाली. म्हणून दरवर्षी हा दिवस जागतिक क्षयरोग दिन म्हणून साजरा केला जातो. क्षयरोगाला टीबी असंही म्हटलं जातं. दरवर्षी हा दिवस साजरा करण्यासाठी एक थीम तयार करण्यात येते. टीबी अथवा क्षयरोग एक संक्रमक आजार आहे. मायक्रो ट्युबरक्लुलोसिस बॅक्टेरियामुळे क्षयरोग होतो. या रोगाचा क्षयरोगग्रस्त रोग्याच्या खोकणे किंवा शिंकणे या माध्यमातून अन्य लोकांमध्ये प्रसार होतो. या रोगाबद्दल योग्य मार्गदर्शन आणि उपचार केल्यास त्याचे निदान होऊ शकते. जर या रोगामध्ये निष्काळजीपणा केला तर त्यामुळे मृत्यू ओढवू शकतो.

जागतिक आरोग्य संघटनेने २०३० पर्यंत या जीवघेण्या आजाराचे जगातून उच्चाटन करण्याचा संकल्प केला आहे. त्यासाठी लक्ष निर्धारण आणि नियोजन करण्यात आलं आहे. तर दुसरीकडे भारताने २०२५पर्यंत देशातून या रोगाचे उच्चाटन करण्याचा संकल्प केला आहे. जागतिक आरोग्य संघटनेच्या एका अहवालानुसार जगभरात दर दिवशी ४ हजार लोकांचा मृत्यू क्षयरोगाने होतो. भारतात क्षयरोगाच्या रुग्णांची संख्या मोठी असून आशियाई देशात भारताचा क्रमांक पहिला आहे. त्यामुळे भारत सरकारच्या वतीने जागतिक आरोग्य संघटनेने ठरवलेल्या लक्षाच्या आधीच देशातून क्षयरोगाचे उच्चाटन करण्यासाठी कार्यक्रम आखण्यात आला आहे. दरवर्षी क्षयरोग दिनाची थीम ठरवली जाते. त्यानुसार मागील वर्षीची थीम येस! वी कॅन एण्ड टीबी. अशी होती. याचाच अर्थ हो, आपण टीबी संपवू शकतो, असा आहे.

२४ मार्च हा दिवस १८८२मध्ये साजरा केला गेला जेव्हा डॉ. रॉबर्ट कोच यांनी बर्लिनच्या इन्स्टिट्यूट ऑफ हायजीन विद्यापीठातील शास्त्रज्ञांच्या एका छोट्या गटाला क्षयरोगाचे कारण, टीबी बॅसिलस शोधून काढल्याची घोषणा करून वैज्ञानिक समुदायाला चकित केले. कोचचे सहकारी, पॉल एहरलिच यांच्या मते, या संस्मरणीय सत्रात, कोच एका घोषणेसह लोकांसमोर हजर झाले ज्याने विषाणूजन्य मानवी संसर्गजन्य रोगाच्या कथेला एक टर्निंग पॉइंट म्हणून चिन्हांकित केले. स्पष्ट, सोप्या शब्दात कोचने एटिओलॉजीचे स्पष्टीकरण दिले. क्षयरोगाची खात्री पटवून देणारे, त्याच्या अनेक सूक्ष्मदर्शकांच्या स्लाइड्स आणि इतर पुरावे सादर करत आहेत. बर्लिनमध्ये कोचच्या घोषणेच्या वेळी क्षयरोग युरोप आणि अमेरिकेत पसरला होता, ज्यामुळे प्रत्येक सात लोकांपैकी एकाचा मृत्यू झाला होता. कोचच्या शोधामुळे क्षयरोगाचे निदान आणि उपचार करण्याचा मार्ग मोकळा झाला. सन १९८२मध्ये रॉबर्ट कोचच्या प्रेझेंटेशनच्या शंभरव्या वर्धापनदिनानिमित्त इंटरनॅशनल युनियन अगेन्स्ट ट्यूबरक्युलोसिस अँड लंग डिसीजने प्रस्तावित केले की २४ मार्च हा अधिकृत जागतिक क्षय दिवस म्हणून घोषित केला जावा. हा आईयूएटीएलडी आणि जागतिक आरोग्य संघटना डब्ल्यूएचओ द्वारे डेफीट टीबी: नाऊ एंड फॉरएव्हर या थीम अंतर्गत वर्षभर चाललेल्या शताब्दीच्या प्रयत्नांचा एक भाग होता. जागतिक क्षयरोग दिनाला डब्ल्यूएचओच्या जागतिक आरोग्य असेंब्ली आणि युनायटेड नेशन्सने एक दशकानंतर अधिकृतपणे वार्षिक घटना म्हणून मान्यता दिली नाही.

सन १९९५ च्या शरद ऋतूत, डब्ल्यूएचओ आणि रॉयल नेदरलँड्स ट्यूबरक्युलोसिस फाउंडेशन-केएनसीव्हीने हेग, नेदरलँड्स येथे पहिल्या जागतिक क्षय दिवस वकिली नियोजन बैठकीचे आयोजन केले होते. एक कार्यक्रम ते पुढील काही वर्षांत सह-प्रायोजक सुरू ठेवतील. सन १९९६मध्ये, डब्ल्यूएचओ, केएनसीव्ही, आईयूएटीएलडी आणि इतर संबंधित संस्था जागतिक क्षयरोग दिनाच्या विविध उपक्रमांसाठी सामील झाल्या होत्या. जागतिक क्षय दिन १९९७साठी डब्ल्यूएचओने बर्लिनमध्ये एक वार्ताहर परिषद घेतली ज्यादरम्यान डब्ल्यूएचओचे महासंचालक हिरोशी नाकाजिमा यांनी घोषित केले की डॉट्स ही या दशकातील सर्वात मोठी आरोग्य प्रगती आहे, त्यानुसार आपण जीव वाचवू शकू. डब्ल्यूएचओचे ग्लोबल टीबी कार्यक्रम संचालक डॉ.अराता कोची यांनी वचन दिले की, आज जागतिक क्षयरोगाच्या साथीची परिस्थिती बदलणार आहे, कारण आम्ही एक प्रगती केली आहे. हे आरोग्य व्यवस्थापन प्रणालीचे यश आहे ज्यामुळे ते शक्य होते. केवळ श्रीमंत देशांमध्येच नव्हे तर विकसनशील जगाच्या सर्व भागांमध्ये क्षयरोगावर नियंत्रण ठेवण्यासाठी, जिथे सर्व क्षयरोगाच्या ९५ टक्के रुग्ण सध्या अस्तित्वात आहेत. सन १९९८पर्यंत जवळपास २०० संस्थांनी जागतिक क्षयरोग दिनानिमित्त सार्वजनिक उपक्रम राबवले. जागतिक क्षयदिन १९९८च्या लंडनमधील वार्ताहर परिषदेत डब्ल्यूएचओने प्रथमच जगातील सर्वात जास्त क्षयरोगाचे ओझे असलेले बावीस देश ओळखले. पुढच्या वर्षी १९९९च्या जागतिक क्षय दिनाच्या तीन दिवसीय डब्ल्यूएचओ/केएनसीव्ही नियोजन बैठकीत १८ देशांतील ६० पेक्षा जास्त प्रमुख टीबी वकिलांनी हजेरी लावली होती.

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष बील क्लिंटन यांनी सन २०००चा जागतिक क्षय दिन साजरा केला. क्लिंटन यांच्या म्हणण्यानुसार, या मानवी शोकांतिका आहेत, आर्थिक संकटे आहेत आणि तुमच्यासाठी संकटांपेक्षा कितीतरी जास्त, ते जगासाठीचे संकट आहेत. रोगाचा प्रसार ही एक जागतिक समस्या आहे ज्यासाठी... कोणतेही राष्ट्र रोगप्रतिकारक नाही. कॅनडामध्ये नॅशनल कोलॅबोरेटिंग सेंटर फॉर डिटरमिनंट्स ऑफ हेल्थने जागतिक क्षय दिन सन २०१४वर नोंदवले की राष्ट्रीय स्तरावर नोंदवलेले ६४ टक्के टीबी प्रकरणे परदेशी जन्मलेल्या व्यक्तींमध्ये आणि २३ टक्के आदिवासी लोकांमध्ये होती, क्षयरोग हे आरोग्याच्या समानतेच्या चिंतेचे प्रमुख क्षेत्र आहे. आज स्टॉप टीबी पार्टनरशिप, टीबीशी लढा देणाऱ्या संस्था आणि देशांचे नेटवर्क आईयूएटीएलडी एक सदस्य आहे आणि डब्ल्यूएचओचे जिनिव्हामध्ये स्टॉप टीबी पार्टनरशिप सचिवालय आहे, रोगाची व्याप्ती आणि ते कसे टाळावे आणि बरे कसे करावे यावर प्रकाश टाकण्यासाठी या दिवसाचे आयोजन केले जाते. जागतिक क्षयरोग दिनाच्या निमित्ताने सर्वांना सावधगिरीबद्दल सदिच्छा!

**-कृष्णकुमार निकोडे**
रामनगर,
गडचिरोली
मो. ९४२३७१४८८३.

# प्रदूषणाचा भस्मासुर रोखा!

स्विस संस्था आयक्युएअरने जागतिक प्रदूषणावर एक अहवाल नुकताच प्रसिद्ध केला आहे. हा अहवाल भारतासाठी धक्कादायक आहे कारण या अहवालात भारत जगातील तिसऱ्या क्रमांकाचा प्रदूषित देश असून बिहारमधील बेगुसराई हे जगातील सर्वाधिक प्रदूषित महानगर क्षेत्र तर जगातील १३४ देशांच्या राजधानीच्या शहरांपैकी दिल्ली हे सर्वात प्रदूषित राजधानीचे शहर असल्याची नोंद या अहवालात करण्यात आली आहे. या अहवालाच्या निर्मितीसाठी वातावरणातील प्रदूषणकारी घटक म्हणून ओळखल्या जाणाऱ्या पीएम - २.५ कणांचे प्रमाण बारकाईने तपासण्यात आले होते.



जगातील १३४ देशांमध्ये बसविण्यात आलेल्या ३० हजार ग्राउंड मॉनिटरच्या माध्यमातून ७३०० शहरांची माहिती संकलित करण्यात आली. या अहवालातील निष्कर्ष पाहिल्यानंतर भारतातील प्रदूषणाची समस्या किती गंभीर आहे हे लक्षात येईल. विशेष म्हणजे जगातील सर्वाधिक प्रदूषित शहरांच्या यादीत भारतातील दिल्ली, मुंबई, बेगुसाराई, गुवाहाटी, कोलकाता, हैदराबाद, चेन्नई यासारख्या मोठ्या आणि महत्वाच्या शहरांचा समावेश आहे. या शहरात वातावरणातील प्रदूषणकारी घटक म्हणून ओळखल्या जाणाऱ्या पीएम - २.५ कणांचे प्रमाण ५३.३ मायक्रोग्राम क्यूबिक मीटर या पातळीवर आले असून ते आरोग्य संघटनेने निर्धारित केलेल्या सुरक्षेच्या पातळीपेक्षा दहापटीने अधिक असल्याचे दिसून आले. स्विस संस्थेचा हा अहवाल देशातील नागरिकांची झोप उडवणारा आहे, कारण आज देशातील सर्वच महत्वाची शहरे प्रदूषणाने गुदमरत आहेत. त्या शहरात राहणाऱ्या नागरिकांचे जीवन प्रदूषणामुळे धोक्यात आले आहे.

एकीकडे २१ व्या शतकातील सुखासीन जीवनाचे मनोहरी चित्र उभे केले जात आहे. स्मार्ट सिटीचे स्वप्न दाखवले जात आहे तर दुसरीकडे याच शहरांची फुफ्फुसे प्रदूषणाने निकामी होत आहेत. प्रदूषणामुळे या शहरातील नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. प्रदूषणामुळे या शहरातील नागरिकांना फुफ्फुसाचे, हृदयाचे, रक्ताभिसरणाचे आजार मोठ्या प्रमाणावर होत आहेत. न्यूमोनिया, पक्षघात, हृदयविकार, फुफ्फुसाचा कर्करोग यासारखे मोठे आजार प्रदूषित हवेमुळेच होत आहेत. प्रदूषणामुळे दिल्लीसारख्या देशाच्या राजधानीची काय अवस्था झाली हे आपण पाहत आहोतच. प्रदूषणामुळे दिल्लीतील शाळा कॉलेजसना सुट्टी देण्याची वेळ प्रशासनावर आली होती.

प्रदूषणामुळे दिल्लीत खेळला जाणारा रणजी सामना रद्द करावा लागला होता. चार वर्षांपूर्वी दिल्लीत इंग्लंड आणि भारत यांच्यात झालेल्या कसोटी सामन्यात खेळाडू चक्क मास्क लावून मैदानात उतरले होते. नंतर हा सामना देखील प्रदूषणामुळे रद्द करावा होता त्यामुळे भारताची जगात नाचक्की झाली होती. जे दिल्लीत आहे तेच मुंबईत आहे. देशाची आर्थिक राजधानी असलेली मुंबई प्रदूषणाच्या बाबतीत देशाच्या राजधानीची बरोबरी करू लागली आहे. मुंबईचे प्रदूषणही उच्चतम पातळीवर पोहचले आहे. प्रदूषणामुळे लोकांना शुद्ध हवा मिळणे दुरापास्त झाले आहे. शुद्ध हवेसाठी लोकांना पैसे मोजावे लागत आहे. मुंबई - दिल्लीसारख्या मोठ्या लोकसंख्येच्या शहरात ऑक्सिजन बार सुरू करण्यात आले आहेत.

एका तासाला २०० ते ५०० रुपये मोजून नागरिक ऑक्सिजन विकत घेत आहेत. इतके होऊनही आपण त्यातून बोध घेत नाही. या मोठ्या शहरात वाहनांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढत आहे. मुंबई, पुणे, नागपूर यासारख्या मोठ्या शहरात लोकसंख्येपेक्षा वाहनांची संख्या अधिक आहे. वाढत्या वाहनांमुळे प्रदूषणात भर पडत आहे. वाहनातून बाहेर पडणाऱ्या धुरात प्रदूषणाचे प्रमाण खूप असते. धूळ, कारखान्यातून निघणारा धूर, बांधकामातून पसरणारे कण, वृक्षतोड, पृथ्वीचे वाढते तापमान, प्लास्टिकचा भस्मासुर अशा अनेक कारणांमुळे प्रदूषणाचा आलेख उंचावत आहे. स्विस संस्थेने जाहीर केलेला हा अहवाल म्हणजे धोक्याची घंटा आहे. वाढते प्रदूषण कमी करण्यासाठी वेळीच ठोस उपाय करायला हवेत. कारखान्यातून बाहेर पडणाऱ्या धुरातून प्रदूषणकारी घटक कमी करण्यासाठी अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करायला हवा. दगड खाणींवर नियंत्रण आणायला हवे. वाहनांची संख्याही कमी करायला हवी. प्रसंगी सम - विषम सारखे कठोर निर्णय घ्यायला हवेत. युरोपीय देशात प्रदूषण कमी करण्यासाठी काय उपाययोजना केल्या जातात याचा अभ्यास करायला हवा.

नागरिकांनी सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेचा अधिकाधिक वापर केला पाहिजे. याशिवाय कचऱ्याचे योग्य वर्गीकरण आणि विल्हेवाट तसेच सौर ऊर्जेच्या वापरावर भर द्यायला हवा. वृक्षारोपण करुन ते वृक्ष जगवले पाहिजेत. शासन, प्रशासन आणि नागरिकांच्या एकत्रितप्रयत्नांतूनच प्रदूषणाचा हा भस्मासुर रोखता येईल.

**-श्याम ठाणेदार**
दौंड, जि. पुणे
९९२२५४६२९५

# लोहा शहरात सार्वजनिक ठिकाणी शौचालय; कामाचा शुभारंभ

**लोहा (प्रतिनिधी)** – नगरपालिका निवडणूक काळात शहरवासीयांना दिलेल्या आश्वासनपूर्तीसाठी आम्ही वचनबद्ध आहोत. नगराध्यक्ष शरद पवार, उपनगराध्यक्ष करीमभाई व त्यांची टीम शहराच्या विकासासाठी चांगले काम करीत आहे. शहरात सार्वजनिक ठिकाणी शौचालय उभारण्यात येईल, असे आश्वासन दिले त्याची पूर्तता केली जात असून, शहरात ३० अद्ययावत शौचगृह उभारले जाणार आहेत. शिवाय जुन्या शहरातील सिमेंट रस्ता सुरू आहे तर चौकाचे सुशोभिकरण लवकरच पूर्णत्वास जाणार आहे. शहरातील प्रभागात विविध कामे सुरू होणार आहेत, अशी माहिती विधिमंडळ उपसमितीचे अध्यक्ष आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांनी दिली आहे.




स्वच्छ भारत मिशन योजनेतून लोहा शहरात छत्रपती शिवाजी महाराज चौक, बसस्थानक परिसर, जिल्हा परिषद हायस्कूल या भागांत ३० शौचालय व मुतारीगृह, स्नानगृह उभारण्यात येणार आहे. त्या कामाचे भूमिपूजन आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्या हस्ते वीज वितरण कार्यालयासमोर मंगळवार, २४ मार्च रोजी करण्यात आले.

यावेळी युवा नेते प्रवीण पाटील चिखलीकर, नगराध्यक्ष शरद पाटील पवार, उपनगराध्यक्ष करीम शेख, मुख्याधिकारी श्रीकांत लाळगे, माजी उपनगराध्यक्ष नगरसेवक केशवराव मुकदम, माजी उपनगराध्यक्ष दत्ता वाले, नगरसेवक हरिभाऊ चव्हाण, माजी सभापती खुशाल पाटील, भास्कर पवार, पंकज परिहार, गणेश बगाडे, मारुती जंगले, बंडू वडजे, नगरसेवक सदा तेलंग, शेषराव तेलंग, सतीश निखाते, भानू पाटील पवार, सूर्यकांत पार्डीकर, शहाजी पवार, अभियंता शरद राहेरकर, कंत्राटदार केंद्रे, गंगाधर महाबळे, राजेश बोडके, तुकाराम दाढेल यांच्यासह मोठ्या संख्येने पदाधिकारी उपस्थित होते.

आ. प्रतापराव पाटील यांनी नगरपालिका निवडणुकीत शहरवासीयांना जे आश्वासन दिले होते त्यात सार्वजनिक शौचालय उभारणी याचा समावेश होता. नगराध्यक्ष शरद पवार यांनी पदभार स्वीकारल्यानंतर शंभर दिवस अजून झाले नाहीत पण त्यांची टीम चांगले काम करीत आहे. आमदार चिखलीकर यांच्या हस्ते शहरातील ३० स्वच्छतागृहाचे भूमिपूजन करण्यात आले. याप्रसंगी त्यांनी शहरवासीयांनी दिलेल्या आश्वासनाची पूर्ती केली जात असून, या सार्वजनिक शौचालयामुळे नागरिकांची होणारी गैरसोय दूर होईल, शिवाय गेल्या अनेक वर्षांपासून असलेली रस्त्यांची मागणी या निमित्ताने पूर्णत्वास जात आहे. जुन्या शहरातून जाणारे सिमेंट रस्ते मी पहिल्यांदा आमदार झाल्यावर नगराध्यक्षा मातोश्री जिजाबाई मुकदम यांच्या काळात पूर्ण केले होते. पुन्हा आमच्याच कार्यकाळात प्रशस्त सिमेंट रस्ते होत आहेत. मुख्य चौकातील छत्रपती शिवरायांच्या पुतळ्यासमोरील गोलाईत आकर्षक सुशोभिकरण लवकरच पूर्ण होणार आहे. तसेच विविध विकास कामे होतील. शहरात नगराध्यक्ष शरद पवार, उपनगराध्यक्ष करीम भाई व त्यांची टिम चांगले काम करत आहे. जनतेच्या अडीअडचणी ते सोडवतील, असा विश्वास आ. चिखलीकर यांनी व्यक्त केला.

आ. चिखलीकर व युवा नेते प्रवीण पाटील यांच्या नेतृत्वाखाली शहरातील जनतेने आमच्यावर विश्वास टाकला व कारभार करण्याची संधी दिली. त्यांच्या अपेक्षा पूर्णत्वास नेवू, असा विश्वासही यावेळी नपा पदाधिकाऱ्यांनी दिला.

# शहीद भगतसिंगांच्या स्वप्नातील भारत घडवण्यासाठी युवकांनी पुढे यावे -कॉ. विनोद गोविंदवार

## एसएफआय संघटनेच्यावतीने शहिदांना अभिवादन

**नांदेड (प्रतिनिधी)** –शहीद भगतसिंग हे साम्राज्यवादविरोधी प्रखर समाजवादी क्रांतिकारक होते. आजच्या काळात साम्राज्यवाद आणि सांप्रदायिकतेविरुद्धचा लढा युवकांनी आपल्या खांद्यावर घेणे ही काळाची गरज आहे, असे प्रतिपादन कॉ. विनोद गोविंदवार यांनी केले.



शहीद भगतसिंग, राजगुरू आणि सुखदेव यांच्या शहीद दिनानिमित्त २३ मार्च रोजी सायन्स महाविद्यालयातील मुलांच्या वसतिगृहात स्टुडंट्स फेडरेशन ऑफ इंडिया (एसएफआय) या विद्यार्थी संघटनेच्या वतीने 'शहीद भगतसिंग आणि आजचा युवक' या विषयावर व्याख्यान व अभिवादन सभेचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीला तिन्ही महान क्रांतिकारकांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी एसएफआयचे जिल्हाध्यक्ष कॉ. विजय लोहबंदे होते. प्रमुख वक्ते म्हणून एसएफआयचे माजी राज्य सचिव कॉ. विनोद गोविंदवार तर प्रमुख अतिथी म्हणून सायन्स महाविद्यालयातील प्रा. राजेश आचेगावे, तेजपालसिंग खेड यांची उपस्थिती होती.

पुढे बोलताना कॉ. गोविंदवार म्हणाले की, आज देशात धर्म आणि जातीच्या आधारावर पडलेली फूट पाहता, भगतसिंगांच्या स्वप्नातील समाजवादी समाजाची स्थापना करणे अधिक आव्हानात्मक बनले आहे. अशा पार्श्वभूमीवर युवकांनी समाजवादी भारत निर्माण करण्यासाठी स्वतःला झोकून देणे हीच शहीदांना खरी श्रद्धांजली ठरेल, असे आवाहन केले.

यावेळी दीप उद्रेक, प्रथम भारती यांच्या क्रांतिकारी रॅपने या कार्यक्रमाची सुरूवात करण्यात आली. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक जिल्हा उपाध्यक्ष कॉ. प्रफुल्ल कऊटकर यांनी केले, तर सूत्रसंचालन जिल्हा सचिव कॉ. मीना आरसे यांनी केले. उपस्थितांचे आभार जिल्हा सहसचिव कॉ. पवन जगडमवार यांनी मानले.

यावेळी सुखविंदरसिंग संधू, प्रा. विनोद चव्हाण, प्रा. द्रोणाचार्य, कॉ. भगवान नाईक, कॉ. जय गायकवाड, कॉ.चंद्रकांत लोखंडे, युनिट अध्यक्ष राजू हळदे, सचिव सतीश देवक्ते, उपाध्यक्ष तेजस पवार, अभिजित कांबळे, सहसचिव वैष्णव रोडे, हरीओम फुलमनते यांच्यासह एसएफआयचे कार्यकर्ते उपस्थित होते.

# गंगाबाई पतंगे यांचे निधन

**नांदेड (प्रतिनिधी)** –येथील प्रसिद्ध कान, नाक व घसा तज्ज्ञ डॉ. संजय पतंगे यांच्या मातोश्री श्रीमती गंगाबाई साहेबराव पतंगे कांडलीकर यांचे वृद्धापकाळाने राहत्या घरी निधन झाले. मृत्यूसमयी त्या ८० वर्षांच्या होत्या.



त्यांचेवर शांतीधाम गोवर्धन घाट येथील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात डॉ. संजय पतंगे, डॉ. श्रीकांत पतंगे व डॉ. सोमेश्वर पतंगे ही तीन मुले तसेच डॉ. सौ. शुभांगी, सौ. स्वाती आणि प्रतीक्षा पतंगे या स्नुषा व नातवंडे असा परिवार आहे. त्यांच्या निधनाने अनेकांनी दुःख व्यक्त केले.

# स्वारातीम विद्यापीठात शहीद दिन साजरा



**नांदेड (प्रतिनिधी)** –येथील स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ येथे सोमवार, दि. २३ मार्च रोजी 'शहीद दिन' साजरा करण्यात आला. विद्यापीठाच्या प्रशासकीय इमारतीतील स्वागत कक्षात आयोजित कार्यक्रमात शहीद भगतसिंग, राजगुरू आणि सुखदेव या महान क्रांतिकारकांच्या स्मृतींना अभिवादन करण्यात आले.

कार्यक्रमाच्या प्रारंभी प्र-कुलगुरू डॉ. अशोक महाजन यांच्या हस्ते शहीदांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून विनम्र श्रद्धांजली वाहण्यात आली. यावेळी विद्यापीठातील विविध विभागांचे प्रमुख व अधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. यामध्ये अधिष्ठाता डॉ. एम. के. पाटील व डॉ. पराग खडके, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक हुशारसिंग साबळे, वित्त व लेखाधिकारी डॉ. राजेश शिंदे, नवोपक्रम व नवसंशोधन संचालक डॉ. शैलेश वाढेर, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. राजपालसिंग चिखलीकर तसेच रासेयो संचालक डॉ. मारुती गायकवाड यांचा समावेश होता. याशिवाय उपकुलसचिव डॉ. रवी सरोदे, कार्यकारी अभियंता तानाजी हुस्सेकर, तुकाराम भुरके, अनिरुद्ध राहेगावकर, जनसंपर्क अधिकारी डॉ. अशोक कदम, अरुण धाकडे आणि डॉ. सुरेखा मुंगल यांचीही उपस्थिती होती.

प्रशासकीय अधिकाऱ्यांसह विद्यापीठातील प्राध्यापक, कर्मचारी आणि विद्यार्थ्यांनी शहीद भगतसिंग, राजगुरू आणि सुखदेव यांच्या प्रतिमांना पुष्प अर्पण करून अभिवादन केले.

# पाथरीत जुगार व मटका बुकीवर पोलीस उपमहानिरीक्षक यांच्या पथकाची धाड; १३ आरोपींविरुद्ध कारवाई, दीड लाखाचा मुद्देमाल जप्त

**नांदेड (प्रतिनिधी)**– पाथरी येथे जुगार अड्डा व मटका बुकी सुरू असल्याची माहिती पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांना प्राप्त झाली. त्यांनी तत्काळ पोलीस अधिकारी व अंमलदारांचे एक पथक परभणी जिल्ह्यातील पाथरी येथे रवाना केले. या पथकाने १३ जणांविरुद्ध कारवाई करून दीड लाखाचा मुद्देमाल जप्त केला आहे.



रविवार, दि. २३ मार्च २०२६ रोजी सदर पथकाने पाथरी शहरातील रशिद कॉलनी परिसरात एका शेडमध्ये तिर्रट नावाचा जुगार खेळणाऱ्या ८ जणांना ताब्यात घेतले. त्यांच्याकडून ३३,२०० रुपयांची रोकड व ७ मोबाईल असा एकूण ८३,२०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला असून, त्यांचेविरुद्ध पाथरी पोलीस ठाणे येथे गुरनं. १४८/२०२६ कलम १२ (अ), महाराष्ट्र जुगार कायद्यान्वये गुन्हा नोंदविला आहे. सदर प्रकरणाचा पुढील तपास पाथरी पोलीस ठाण्यातील पोहेकॉ. अनिल हत्तीअंबीरे यांच्याकडे सोपविण्यात आला आहे.

तसेच पाथरी शहरातील नायब हॉटेलचे बाजूस असणाऱ्या एका शेडमध्ये फन टारगेट चक्री (बिंगो) नावाचा जुगार ऑनलाईन पद्धतीने चालवित असल्याचे माहितीवरून सदर ठिकाणी कारवाई करत ५ आरोपींना ताब्यात घेऊन, त्यांच्याकडून ३६,६०० रुपयांची रोकड, १ मोबाईल, संगणक व साहित्य असा एकूण ६६,६०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला असून, त्यांचेविरुद्ध पाथरी पोलीस ठाणे येथे गुरनं १४९/२०२६ कलम १२ (अ), महाराष्ट्र जुगार कायद्यान्वये गुन्हा नोंदविला आहे. सदर प्रकरणाचा पुढील तपास पाथरी पोलीस ठाण्यातील पोहेकॉ. नारायण शितळे यांच्याकडे सोपविण्यात आला आहे. उपरोक्त दोन्ही कारवायांत, पथकाने एकूण ६९,८०० रुपयांची रोकड, ८ मोबाईल, संगणक व साहित्य असा एकूण १ लाख, ४९ हजार, ८०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. या कारवाईत पोलीस उपनिरीक्षक पंकज इंगळे यांचेसह पोहेकॉ. प्रदीप खानसोळे, पोहेकॉ. संजीव जिंकलवाड, पोकॉ. गणेश धुमाळ व पोकॉ. कामाजी गवळी यांनी सहभाग घेतला.

# खून प्रकरणातील फरार दोघांना एलसीबीच्या पथकाने केली अटक

**नांदेड (प्रतिनिधी)** – ग्रामीण पोलीस ठाण्याच्या हद्दीत खून करून मागील काही दिवसांपासून फरार असलेल्या दोघांना स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस उपनिरीक्षक महेश कोरे यांच्या पथकाने अटक केली आहे.



स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक उदय खंडेराय यांनी शहर व जिल्ह्यातील फरार व पाहिजे असलेल्या आरोपींना अटक करण्याच्या सूचना वरिष्ठांच्या आदेशावरून आपल्या अधिनस्त अधिकाऱ्यांना दिल्या होत्या. त्यावरून महेश कोरे यांची टीम कामाला लागली. जिल्ह्यांत पेट्रोलींग करत असताना त्यांना गोपनीय माहिती मिळाली की, पोलीस स्टेशन ग्रामीण ४५०/ २०२५ कलम १०३,१०९,३५३,३५१(२),३५१(३),१९०, सह कलम ३, ४/ २५, २७ भारतीय हत्यार कायदा अंतर्गत गुन्ह्यांतील फरार व पाहिजे असलेले दोन आरोपी लोहा- कंधार मार्गावरील रस्त्याच्या पुलाखाली थांबलेले आहेत, अशी माहिती मिळाली. या माहितीवरून आरोपीचा शोध घेतला असता अजय ऊर्फ बबल्या भगवान माने (वय २६ वर्ष, रा. वसरणी ता. जि. नांदेड) आणि निखील उर्फ चिटचा रमेश घोरपडे (वय २१ वर्ष, रा. निमगाव ता. अर्धापूर जि. नांदेड) असे असल्याचे सांगत या आरोपींना पुढील कारवाईसाठी पोलीस स्टेशन नांदेड ग्रामीण पोलीस स्टेशनच्या ताब्यात दिले आहे.

पान १ वरून...

**विरेंद्रसिंघ गाडीवाले दुसऱ्यांदा...**

असल्याने त्यांची बिनविरोध निवड झाल्याचे पिठासीन अधिकाऱ्यांनी जाहीर केले. नूतन सभापतींचे पिठासीन अधिकारी राहुल कर्डिले, आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे यांनी पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन केले. या बैठकीला स्थायी समितीचे सदस्य उपस्थित होते. स्थायी समितीत एमआयएम व काँग्रेस-वंचित बहुजन आघाडीचे प्रत्येकी तीन सदस्य आहेत. परंतु विरोधी पक्षाच्यावतीने उमेदवार उभा केला नव्हता. विरेंद्रसिंघ गाडीवाले हे ज्येष्ठ नगरसेवक असून सलग सहा वेळा नगरसेवक म्हणून निवडून आले आहेत. माजी मुख्यमंत्री तथा खा. अशोक चव्हाण यांचे अत्यंत विश्वासू म्हणून ते ओळखले जातात. यापूर्वी त्यांनी सभागृह नेते व स्थायी समितीचे सभापतीपद भूषविले आहे. सभापतीपदी त्यांची निवड झाल्याबद्दल महापौर कविता मुळे, माजी महापौर शैलेजा स्वामी, सभागृह नेते महेश कनकदंडे, दिलीप कंदकुर्ते, किशोर स्वामी, सतीश देशमुख तरोडेकर, बाळू उर्फ महेश खोमणे, अमित मुथ्था, अभिषेक सौदे, कविता गड्डम यांच्यासह नगरसेवक तसेच अधिकारी, कर्मचारी व भाजपच्या कार्यकर्त्यांनी अभिनंदन केले.

--------------

**डॉ. समीर कदम यांच्यावर...**

कुलगुरू डॉ. विलास सपकाळ, एमजीएम संभाजीनगरचे अधिष्ठाता डॉ. राजेंद्र बोहरा, माजी मंत्री नामदेवराव गाडेकर, माजी मंत्री माधवराव पाटील किन्हाळकर, स्वच्छतादूत माधवराव शेळगावकर, राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष भगवानराव पाटील आलेगावकर, रणजित ककड, अमरदीप कदम, डॉ. विजय कदम, राहुल कदम, विश्वास कदम, सचिन जाधव, संतोष बोराडे, संजयराव बोराडे, डॉ. अनिल बोराडे, बालाजी शिंदे, प्रसाद सूर्यवंशी, डी. एस.कदम, सत्यजीत पाथर्डीकर, भगवान शिंदे, प्रसाद शिंदे, लता कदम, शोभा कदम, अर्चना कदम, डॉ. शिल्पा कदम, आ. बालाजीराव कल्याणकर यांच्या सुविद्य पत्नी संध्याताई कल्याणकर, आकांक्षा कदम, डॉ. सोनाली कदम, जयश्री जाधव, रचना जाधव, मिनल जाधव, सुभा महाजन, आशाताई पाथर्डीकर, अपर्णा ककड, रविना कदम, सारीका गाडेकर, अस्मिता सुर्यवंशी, क्षितीजा गाडेकर, प्रणिता सावंत, डॉ. स्मिता जाधव, तसेच डॉ. प्रवीण सूर्यवंशी, आशिष गाडेकर, डॉ. गिरीष गाडेकर, राजेश कदम, शहाजी देसाई, तुकाराम पांचाळ, तंटामुक्त गाव समितीचे अध्यक्ष भीमराव पाटील कदम, भरत पेंटावार, श्रीराम जाधव, अशोक पाटील, समीर पाटील, सौरव अग्रवाल, श्रीकांत थोरात, डॉ. जी. एस. नागशेटी, विश्वास साठे, प्रसाद पांडे, बाळासाहेब देशमुख, उत्तमराव आलेगावकर, बालासाब मादसवाड, निलेश राऊत, नानासाहेब साळवे, मोहन घाडगे, संजयराव कदम, प्रकाश कदम, प्रभाकर जाधव, साहेबराव नवल, दै. लोकपत्रचे कार्यकारी संपादक रविंद्र तहकीक, लेखापाल गजानन पांडे, पत्रकार प्रशांत गवळे, सुरेश आंबटवार, शिवाजी शिंदे यांच्यासह एमजीएम मुंबई, एमजीएम औरंगाबाद, एमजीएम नांदेड तसेच लिंबगाव व कदम कुटुंबीय, नातलग व पंचक्रोशीतील नागरिकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# शुक्रवारी माहूर येथे प्लेसमेंट ड्राईव्ह व रोजगार मेळावा

**नांदेड (प्रतिनिधी)**– जिल्ह्यातील बेरोजगार उमेदवारांना रोजगाराची संधी उपलब्ध व्हावी यासाठी जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र नांदेड व हिरकणी शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, माहूर यांच्या संयुक्त विद्यमाने शुक्रवार २७ मार्च २०२६ रोजी हिरकणी शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, माहूर येथे पंडित दीनदयाळ उपाध्याय प्लेसमेंट ड्राईव्ह/रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे.

या प्लेसमेंट ड्राईव्ह /रोजगार मेळाव्यामध्ये विविध खाजगी आस्थापनामध्ये रोजगार व नोकरीच्या संधी साठी मुलाखती घेण्यात येणार असून जिल्ह्यातील बेरोजगार उमेदवारांनी शुक्रवार २७ मार्च २०२६ सकाळी १० वा. पासून हिरकणी शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, माहूर येथे उपस्थित राहावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

# दहावीची परीक्षा संपली आता ११ प्रवेशासाठी कागदपत्रांची जुळवाजुळव करावी -शिक्षणाधिकारी माधव सलगर

**नांदेड (प्रतिनिधी)**– इयत्ता १० वीची परीक्षा १८ मार्च रोजी संपली आहे. दहावीच्या विद्यार्थी व त्यांच्या पालकांना आता पुढील महत्त्वाचा टप्पा म्हणजे इयत्ता ११ वीसाठी प्रवेश घेणे. मागील वर्षापासून राज्यभर इयत्ता ११ वीचे प्रवेश हे ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेद्वारे झाले होते. त्यानुसारच यंदा देखील सन २०२६-२७ साठी इयत्ता ११ वीचे प्रवेश ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेद्वारेच होणार आहेत. त्यामुळे इयत्ता १० वीच्या विद्यार्थ्यांनी व त्यांच्या पालकांनी प्रवेश प्रक्रिया सूरू होण्यापूर्वी कागदपत्रांची जुळवा-जुळव करुन घेणे व आवश्यक पूर्वतयारी करण्याचे आवाहन शिक्षणाधिकारी माध्यमिक माधव सलगर यांनी केले आहे.

येत्या काही कालावधीत इयत्ता ११ वीची प्रवेश प्रक्रियेच्या अनुषंगाने नवीन पोर्टल कार्यान्वित होणार असून, याद्वारे कॉलेजचे रजिस्ट्रेशन करणे, शाखा व विषयांची नोंदणी करण्याचे काम कॉलेजला करावयाचे असून त्यानंतर लगेचच विद्यार्थ्यांना रजिस्ट्रेशन करण्यासाठी पोर्टल कार्यान्वित होणार आहे. त्यामुळे कॉलेज प्रशासन व विद्यार्थ्यांनी पूर्वतयारी करुन आवश्यक कागदपत्रांची जुळवाजुळव करुन ठेवावी, जेणेकरुन ऐनवेळी धावपळ होणार नाही व वेळेत रजिस्ट्रेशनचे काम पूर्ण होईल, असे आवाहन शिक्षणाधिकारी माधव सलगर यांनी केले आहे.

नांदेड जिल्ह्यात मागील वर्षी २५६ कॉलेजमधून ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया राबविण्यात आली होती. यंदा देखील त्या सर्व कॉलेजमधून ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया राबविण्यात येणार आहे. त्यामुळे कॉलेज प्रशासनाने पुढील कागदपत्रे पूर्वीच तयार करुन ठेवावीत, असेही कळविण्यात आले आहे.

# तुम्ही स्वतःला सिद्ध करा, जग तुम्हांला प्रसिद्ध करेल -शिवाजीराजे पाटील

**नांदेड (प्रतिनिधी)**– तुम्ही स्वतःला सिद्ध करा, जग तुम्हांला प्रसिद्ध करेल, असे प्रतिपादन सुप्रसिध्द करिअर मार्गदर्शक शिवाजीराजे पाटील बाभळीकर यांनी केले.



संस्कृती संवर्धन मंडळ सगरोळी व रिलायन्स फाउंडेशनच्या संयुक्त विद्यमाने संस्थाध्यक्ष प्रमोद देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित भव्य रोजगार मेळाव्यात जवाहरलाल नेहरु लिडरशिप इन्स्टिट्यूटचे मास्टर कोच इंजि शिवाजीराजे पाटील बोलत होते.

पुढे ते म्हणाले, शुड नो समथिंग अबाऊट एव्हरीथिंग एंड एव्हरीथिंग अबाऊट समथिंग. जीवघेण्या स्पर्धेच्या काळात तुम्ही स्वतःला सिद्ध करा, जग तुम्हांला प्रसिध्द करेल, हा आपल्या जगण्याचा सिंपल फंडा बनवायला हवा. बोलणाऱ्यांची माती विकली जाते, मुक्याचे सोने सुध्दा गोदामात पडून राहते. आधुनिक विज्ञानयुगात अनेक मल्टिनॅशनल कंपन्यांमध्ये प्लेसमेंटसाठी हजारो ओपनिंग्ज आहेत, पण योग्य उमेदवार भेटत नाहीत ही बहुतांश एचआर मॅनेजर्सची खंत आहे. मार्केट डिमांडनुसार अंगभूत कौशल्य विकसित केली, मराठी, हिंदी, इंग्रजी व्यतिरिक्त एखाद्या परकीय भाषेवर प्रभुत्व मिळवून बहुभाषिक होता आले तर जगभरात संधीची असंख्य कवाडे खुली होतात. त्यामुळे सर्वगुणसंपन्नतेकडे विशेष लक्ष द्यावे, असे आवाहन शिवाजीराजे पाटील बाभळीकर यांनी केले.

यावेळी विचारपीठावर संस्कृती संवर्धन मंडळाचे सचिव डॉ. जयंत जकाते, कृषी विज्ञान केंद्राचे प्रा. व्यंकट शिंदे, श्रुती देशमुख, रोहित देशमुख, शरद पवार निवघेकर आदी मान्यवर उपस्थित होते.

चाळीसहुन अधिक राष्ट्रीय व बहुराष्ट्रीय कंपन्यांच्या प्रतिनिधींची उपस्थिती लाभलेल्या सगरोळी रोजगार मेळाव्यात पुढे बोलताना शिवाजीराजे पाटील म्हणाले की, शाळा व महाविद्यालये ही केवळ शैक्षणिक केंद्रे नसून, मानवाच्या एकूणच जडणघडणीचे स्त्रोत असायचे. हल्ली दोन-तीन ट्युशन ज्वाईन करण्यासाठी इंग्रजी माध्यमाच्या शाळेतील नॉन स्कुलिंग बॅचच्या संकल्पनेमुळे मुलांचे बालपण आपण हिरावून घेतोय का? हा विचार अवश्य करावा. पिटी व कार्यानुभव यांसारखे वर्ग आपण जवळपास हद्दपार करुन लेकरांना विद्यार्थीपण जगण्यापासून वंचित केले. वादविवाद, वक्तृत्व, कथाकथन, नाट्य, क्रीडा, इत्यादी स्पर्धांमधील सहभागातून विद्यार्थी व्यवहारकुशल व बहुआयामी होतो याचा विसर आपल्याला पडला. आपण मॅन नाही तर मशीन घडवतोय का? जीवनमूल्यांचा अंगिकार न करणारी भावनाशून्य व संवेदनाहीन पिढी कुटुंब, समाज व राष्ट्राच्या हिताची कशी ठरू शकेल? असा श्रोत्यांना अंतर्मुख करणारा प्रश्न शिवाजीराजे पाटील यांनी उपस्थित केला.

# इंदिरा गांधी महाविद्यालयात शहीद दिनानिमित्त अभिवादन



**नवीन नांदेड (प्रतिनिधी)**– येथील इंदिरा गांधी महाविद्यालयात शहीद भगतसिंग, सुखदेव आणि राजगुरु यांना अभिवादन करण्यात आले.

२३ मार्च हा शहीद दिवस तरुण पिढीमध्ये देशभक्तीची भावना जागृत करण्यासाठी आणि क्रांतिकारकांच्या बलिदानाचे स्मरण करण्यासाठी म्हणून श्री शारदा भवन एज्युकेशन सोसायटी संचालित इंदिरा गांधी वरिष्ठ महाविद्यालय सिडको नांदेड येथे पाळण्यात आला. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दुर्गेश रवंदे यांच्या मार्गदर्शनाखाली अभिवादनपर कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.


शहीद दिवसाचे महत्त्व व वेगळेपण आपल्या प्रास्ताविकात डॉ. हनुमंत भोपाळे यांनी विशद केले. तर महाविद्यालयाचे प्राचार्य. डॉ. दुर्गेश रवंदे यांनी हा दिवस आपल्या भारतीयांना नेहमीच प्रेरणादायी व दिशादर्शक ठरेल असे मत व्यक्त केले.

यावेळी क्रांतिकारक भगतसिंग, सुखदेव आणि राजगुरु यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी महाविद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

निरोगी आरोग्याचा कानमंत्र

# निरामय

# सततचा खोकला, थुंकीतून रक्त? क्षयरोगाची लक्षणे!



**भारतात क्षयरोग ही एक मोठी आरोग्य समस्या आहे. आरोग्य सेवा आणि जनजागृतीमध्ये सुधारणा होऊनही मोठ्या संख्येने क्षयरोगाचे रुग्ण अजूनही मोठ्या प्रमाणावर आढळून येतात. गर्दीच्या ठिकाणी हा आजार वेगाने पसरतो. आम्ही क्षयरोगाची कारणे, लक्षणे आणि प्रतिबंधात्मक उपायांबद्दल माहिती देणार आहोत. क्षयरोग हा एक संसर्गजन्य आजार आहे. याचा प्रामुख्याने फुफ्फुसांवर परिणाम होतो, परंतु तो शरीराच्या इतर भागांमध्येही पसरू शकतो. हा आजार मायकोबॅक्टेरियम ट्युबरक्युलोसिस' नावाच्या जिवाणूमुळे होतो. जर क्षयरोगावर त्वरित आणि योग्य उपचार केले नाहीत, तर तो जीवघेणा ठरू शकतो.**

## क्षयरोग कसा पसरतो?

क्षयरोगाची लागण झालेली व्यक्ती खोकल्याने किंवा शिंकण्याने इतरांना हा आजार पसरवू शकते. केवळ ज्यांना सक्रिय क्षयरोग आहे, तेच त्याचा प्रसार करू शकतात. हवा खेळती राहण्याची अपुरी जागा आणि गर्दीची ठिकाणे ही क्षयरोग पसरण्याची सर्वाधिक शक्यता असलेली ठिकाणे आहेत. भारतात कुपोषण, कमकुवत रोगप्रतिकारशक्ती आणि अयोग्य जीवनशैली या आजाराच्या प्रसारास कारणीभूत ठरतात. मधुमेह आणि एचआयव्ही संसर्ग असलेले रुग्ण, धूम्रपान आणि मद्यपान, तसेच वायू प्रदूषण यामुळे देखील टीबी होऊ शकतो.

## क्षयरोगाची लक्षणे

» दोन आठवड्यांपेक्षा जास्त काळ टिकणारा खोकला.
» खोकल्यातून कफ किंवा रक्त पडणे.
» अकारण थकवा आणि अशक्तपणा.
» भूक न लागणे, सतत वजन कमी होणे.
» सतत ताप, सतत छातीत दुखणे.

## क्षयरोगाचे प्रकार

» फुफ्फुसीय टीबी : सर्वात सामान्य प्रकार म्हणजे फुफ्फुसीय टीबी, जो फुफ्फुसांवर परिणाम करतो. याच्या लक्षणांमध्ये दोन आठवड्यांपेक्षा जास्त काळ टिकणारा खोकला, छातीत दुखणे, खोकल्यातून रक्त किंवा कफ पडणे, ताप, रात्री घाम येणे, थकवा आणि वजन कमी होणे यांचा समावेश होतो. बरेच लोक या लक्षणांकडे दुर्लक्ष करतात किंवा त्यांना सामान्य सर्दी समजतात, ज्यामुळे उपचारात विलंब होतो.

» फुफ्फुसाव्यतिरिक्त क्षयरोग (Extrapulmonary TB) : क्षयरोग शरीराच्या इतर भागांवरही परिणाम करू शकतो. याला फुफ्फुसाव्यतिरिक्त क्षयरोग (Extrapulmonary TB) म्हणतात. याचा परिणाम हाडे, सांधे, मेंदू किंवा पोटावर होऊ शकतो. लक्षणे बाधित भागावर अवलंबून असतात, जसे की मानेला सूज, सांधेदुखी किंवा तीव्र डोकेदुखी. ही लक्षणे कमी स्पष्ट असतात, त्यामुळे या प्रकारचा क्षयरोग लवकर ओळखला जाऊ शकत नाही.

## क्षयरोगाची लक्षणे ओळखा...

न ओळखले गेलेले क्षयरोगाचे रुग्ण ही एक मोठी चिंतेची बाब आहे. क्षयरोगाची अनेक प्रकरणे उपचाराविना राहतात आणि त्यांची नोंदही होत नाही, ज्यामुळे संसर्ग पसरत राहतो. क्षयरोगावर योग्य उपचार शक्य आहे. रुग्णांनी अनेक महिने नियमितपणे औषधे घेतली पाहिजेत. आजार पुन्हा उद्भवू नये म्हणून उपचारांचा संपूर्ण कोर्स करणे आवश्यक आहे. भारतात क्षयरोग हे एक मोठे आव्हान आहे, परंतु खबरदारी, जागरूकता आणि योग्य उपचाराने तो टाळणे शक्य आहे.

## क्षयरोगाचा प्रसार कसा टाळावा?

खोकताना किंवा शिंकताना आपले तोंड झाका. लोकांशी जवळचा संपर्क टाळा. नियमित लसीकरण करून घ्या. कामावर किंवा शाळेत जाऊ नका. घराबाहेर जाताना मास्क घाला. आपले घर हवेशीर ठेवा.

# उष्माघातापासून बचावासाठी काय करावे, काय करू नये...

## काय करावे?

पुरेसे पाणी प्या. तहान लागली नसली तरीही दर अर्ध्या तासाने पाणी प्या. घराबाहेर पडताना डोके झाकण्यासाठी छत्री अथवा टोपीचा वापर करा. दुपारी १२ ते ३ वाजे दरम्यान शक्यतो घराबाहेर जाणे टाळा. सूर्यप्रकाशापासून वाचण्यासाठी घरातील पडदे आणि झडपांचा वापर करा. उष्णतेच्या लाटेच्या माहितीसाठी रेडिओ, टीव्ही किंवा वर्तमानपत्रातील माहितीचा वापर करा. हलके, पातळ व सच्छिद्र सुती कपडे वापरावेत. प्रवासात पिण्याचे पाणी सोबत ठेवावे. उन्हात काम करत असल्यास टोपी, छत्री किंवा ओल्या कपड्याने डोके, मान, चेहरा झाकावा. शरीरातील पाण्याचे प्रमाण कमी होत असल्यास ORS, घरी बनवण्यात आलेली लस्सी, कैरीचे पन्हे, लिंबू पाणी, ताक इत्यादीचा वापर करावा. अशक्तपणा, डोकेदुखी, सतत येणारा घाम इत्यादी उन्हाचा झटका बसण्याची लक्षणे ओळखावीत व चक्कर येत असल्यास तात्काळ डॉक्टरांचा सल्ला घ्यावा. गुरांना छावणीत ठेवावे, पिण्यास त्यांना पुरेसे पाणी द्यावे. घर थंड ठेवण्यासाठी पडदे, शटर व सनशेडचा वापर करण्यात यावा. तसेच रात्री खिडक्या उघड्या ठेवाव्या. पंखे, ओले कपडे याचा वापर करावा. तसेच थंड पाण्याने वेळोवेळी स्नान करावे. कामाच्या ठिकाणी पिण्याच्या थंड पाण्याची व्यवस्था करावी. सूर्यप्रकाशाचा थेट संपर्क टाळण्यासाठी कामगारांना सूचित करावे. पहाटेच्या वेळी जास्त कामाचा निपटारा करण्यात यावा. तसेच बाहेर कामकाज करीत असल्यास मध्ये-मध्ये विश्रांती घेऊन नियमित आराम करावा. गरोदर स्त्रिया आणि आजारी व्यक्तींची अधिक काळजी घ्यावी.

## काय करू नये?

उन्हात अतिकष्टाची कामे करू नका. दारू, चहा, कॉफी आणि कार्बोनेटेड- थंड पेये घेऊ नका. दुपारी १२ ते ३ या वेळे दरम्यान घराबाहेर जाणे टाळा. उच्च प्रथिनयुक्त आणि शिळे अन्न खाऊ नका. लहान मुले किंवा पाळीव प्राण्यांना बंद असलेल्या व पार्क केलेल्या वाहनात ठेवू नये. गडद, घट्ट व जाड कपडे घालण्याचे टाळावे. बाहेर तापमान जास्त असल्यास शारीरिक श्रमाची कामे टाळावी. उन्हाच्या कालावधीत स्वयंपाक करण्याचे टाळण्यात यावे. तसेच मोकळ्या हवेसाठी स्वयंपाक घराची दारे व खिडक्या उघडी ठेवण्यात यावीत. उष्मा लाटेपासून स्वतःचा व आपल्या आप्तेष्टांच्या बचावासाठी अशा उपाययोजना अवलंबाव्या, असे आवाहन निवासी उपजिल्हाधिकारी तथा जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाचे मुख्य कार्यकारी अधिकारी जनार्दन विधाते यांनी केले आहे.

# खाण्यावर नियंत्रण ठेवूनही होत नाही वजन कमी? 8 छुपी कारणे...

**असे अनेक जण असतात जे वाढलेल्या वजनाबद्दल चिंतित असतात. ते तक्रार करतात की खाण्यावर नियंत्रण ठेवूनही त्यांचे वजन कमी होत नाही. लठ्ठपणाबद्दलचा एक सर्वात सामान्य गैरसमज म्हणजे तो केवळ अति खाण्यामुळे किंवा जंक फूडमुळे होतो. वास्तविक पाहता वजन वाढणे हे हार्मोन्स, जीवनशैली, आनुवंशिकता आणि शरीरातील काही अंतर्गत प्रक्रियांमुळे होऊ शकते. हे घटक अनेकदा लपलेले राहतात आणि लक्षात येत नाहीत. जर तुमचे वजन कमी होत नसेल, तर या घटकांचा विचार करा...**



» औषधे : काही औषधांमुळे नकळतपणे वजन वाढू शकते. यामध्ये अँटीडिप्रेसंट्स (अवसादरोधी), स्टिरॉइड्स आणि मधुमेहावरील विशिष्ट औषधांचा समावेश होतो. तथापि, वजन कमी करण्यासाठी आपल्या डॉक्टरांचा सल्ला घेतल्याशिवाय ही औषधे घेणे थांबवू नका. उपलब्ध पर्यायांबद्दल आपल्या डॉक्टरांचा सल्ला घ्या.

» इन्सुलिन : जेव्हा शरीराची ग्लुकोजचे ऊर्जेमध्ये रूपांतर करण्याची क्षमता कमी होते, तेव्हा उरलेल्या ग्लुकोजचे चरबीमध्ये रूपांतर होऊन ते शरीरात साठवले जाते. ही स्थिती टाईप २ मधुमेह किंवा प्री-डायबिटीजशी जवळून संबंधित आहे. या स्थितीतील रुग्णांना पोटावर चरबी जमा होणे, सतत भूक लागणे आणि वजन कमी करण्यात अडचण येणे यांसारख्या समस्यांचाही अनुभव येतो.

» जीवनशैली : आहारावर नियंत्रण ठेवल्यानंतरही, बैठी जीवनशैली लठ्ठपणास कारणीभूत ठरू शकते. शारीरिक हालचालींच्या अभावामुळे कॅलरी कमी खर्च होतात आणि चयापचय क्रिया मंदावते. त्यामुळे, जास्त वेळ बसून राहणे, शरीराची कमी हालचाल करणे किंवा स्नायू तयार करणाऱ्या व्यायामांमध्ये सहभागी न होणे, यामुळे वजन वाढू शकते.

» हार्मोन्सचे असंतुलन : चयापचय, भूक आणि चरबी साठवणुकीचे व्यवस्थापन करण्यासाठी हार्मोन्स महत्त्वाचे असतात. या हार्मोन्समधील बिघाड किंवा असंतुलनामुळे लठ्ठपणा येऊ शकतो. सर्वात सामान्य कारण म्हणजे थायरॉईड हार्मोन्सची कमतरता. ज्यामुळे चयापचय मंदावते. याला हायपोथायरॉईडीझम म्हणतात आणि त्यामुळे वजन वाढणे, थकवा आणि सुस्ती येऊ शकते. याव्यतिरिक्त, महिलांमधील पॉलीसिस्टिक ओव्हरी सिंड्रोम (PCOS) मुळे देखील हार्मोन्सचे असंतुलन आणि इन्सुलिन प्रतिरोध निर्माण होतो, ज्यामुळे पोटाभोवती वजन वाढते.

» आनुवंशिकता : काही लोकांमध्ये आनुवंशिक प्रवृत्ती असते. ज्यामुळे त्यांचे वजन सहज वाढते. जनुके तुमच्या भूकेवर, चरबीच्या साठवणुकीवर आणि चयापचय दरावर लक्षणीय प्रभाव टाकतात. तथापि, हे लक्षात ठेवा की जनुकांमुळे वजन वाढण्याची शक्यता वाढत असली तरी, याचा अर्थ असा नाही की लठ्ठपणा टाळता येत नाही.

» झोप आणि सर्केडियन लय (जैविक लय) : संप्रेरकांच्या नियमनासाठी झोप महत्त्वाची आहे. झोपेच्या कमतरतेमुळे लेप्टिन आणि घ्रेलिनसारख्या भूक नियंत्रित करणाऱ्या संप्रेरकांमध्ये व्यत्यय येतो. यामुळे उच्च-कॅलरीयुक्त पदार्थांची तीव्र इच्छा होण्याची शक्यता वाढते. रात्री उशिरा झोपणे, मोबाईल फोन आणि लॅपटॉपचा दीर्घकाळ वापर आणि रात्रीची पाळी (नाईट शिफ्ट) यामुळे देखील शरीराच्या नैसर्गिक सर्केडियन लयीवर परिणाम होतो, ज्यामुळे चयापचय दर मंदावतो आणि वजन वाढण्यास हातभार लागतो.

» ताण आणि कॉर्टिसोल : मानसिक आरोग्य आणि चयापचय संतुलनासाठी तणावाचे व्यवस्थापन करणे आवश्यक आहे. तणावामुळे कॉर्टिसोलची पातळी वाढते आणि दीर्घकाळ वाढलेली पातळी चरबीच्या साठवणुकीस कारणीभूत ठरू शकते, विशेषतः पोटाच्या भागात. काही लोकांमध्ये, वाढलेल्या तणावामुळे भावनिक खाण्याच्या सवयी देखील लागू शकतात, ज्यामुळे लठ्ठपणा वाढतो.

» आतड्यांचे आरोग्य : आतड्यांतील सूक्ष्मजीवांचा (मायक्रोबायोम) चयापचय क्रियेवर थेट परिणाम होतो. प्रक्रिया केलेले अन्न, वारंवार प्रतिजैविकांचा (अँटिबायोटिक्स) वापर, अँटासिडचा (आम्लशामक) अतिवापर किंवा अयोग्य आहारामुळे अनेकदा आतड्यातील जीवाणूंचे संतुलन बिघडते, ज्यामुळे शरीराच्या कॅलरीज साठवण्याच्या आणि खर्च करण्याच्या क्षमतेवर परिणाम होतो. अनेक अभ्यासांनुसार, आतड्यातील अस्वास्थ्यकर जीवाणूंमुळे दाह (सूज) आणि लठ्ठपणाचा धोका वाढतो.



# मेडिटेशनने हार्टअ‍ॅटॅक, स्ट्रोकचा धोका होतो कमी, ध्यानाची योग्य पद्धत अन् फायदे जाणून घ्या...



## ध्यान कसे सुरू करावे?

» दररोज १०-१५ मिनिटे शांत ठिकाणी बसा.
» खोलवर श्वास घ्या आणि सोडा.
» आपले लक्ष श्वासावर केंद्रित करा.
» हळूहळू ध्यानाचा वेळ वाढवा.
» दररोज २०-३० मिनिटे ध्यान करा.


## ध्यानाचे फायदे

» तणाव कमी होतो : नियमित ध्यान मनाला शांत करते. ध्यान भीती, चिंता, तणाव आणि नैराश्य यांसारखी लक्षणे कमी करण्यास मदत करते.

» एकाग्रता वाढते : ध्यान मेंदूची निर्णय घेण्याची क्षमता वाढवते. ते स्मरणशक्ती तीक्ष्ण करते, कामावर लक्ष केंद्रित करण्यास मदत करते आणि कार्यक्षमता सुधारते.

» निद्रानाशापासून आराम मिळतो : ध्यान मानसिक शांती देते, चांगली झोप लागण्यास मदत करते आणि निद्रानाशापासून आराम देते.

» नकारात्मक विचार येत नाहीत : ध्यान करणारी व्यक्ती भावनिकदृष्ट्या स्थिर आणि सकारात्मक राहते. प्रतिकूल परिस्थितीत नकारात्मक विचार येण्याची शक्यता कमी असते आणि योग्य उपाय सापडतात.




**आजच्या वेगवान जीवनात तणाव आणि चिंता झपाट्याने वाढत आहेत. याचा थेट परिणाम हृदयाच्या आरोग्यावर होतो. अशा परिस्थितीत नियमित ध्यानधारणा केल्याने मानसिक शांती मिळते आणि हृदयाचे आरोग्य चांगले राखण्यासही मदत होते. तणाव कमी करण्यासाठी ध्यान हा एक अत्यंत प्रभावी मार्ग आहे. जेव्हा आपण नियमितपणे ध्यान करतो, तेव्हा शरीरातील तणाव निर्माण करणारे हार्मोन्स कमी होतात, ज्यामुळे हृदयावरील दाबही कमी होतो...**

» ध्यान कसे सुरू करावे? : तणाव टाळणे शक्य नाही, परंतु ध्यानाच्या माध्यमातून त्यावर सहज नियंत्रण ठेवता येते. ध्यान हृदयाच्या आरोग्यासाठी खूप फायदेशीर आहे. ध्यान तणाव आणि कॉर्टिसोल हार्मोन्स कमी करते, ज्यामुळे हृदयाचे ठोके आणि रक्तदाब नियंत्रित ठेवण्यास मदत होते. दररोज १०-१५ मिनिटे ध्यान केल्याने हृदयविकार, पक्षाघात आणि हृदयविकाराच्या झटक्याचा धोका ४८% पर्यंत कमी होऊ शकतो. यामुळे तणाव कमी होतो आणि उच्च रक्तदाब नियंत्रित करणे सोपे होते.

» रक्तदाब नियंत्रित करते ध्यान : ध्यान नसांना शिथिल करते आणि रक्तदाब नियंत्रित करण्यास मदत करते. सतत उच्च रक्तदाबामुळे हायपरटेन्शनचा धोका वाढू शकतो, जे हृदयविकाराचे एक प्रमुख कारण आहे. ध्यान तणाव कमी करते आणि मनाला शांत करते. नियमित ध्यान केल्याने हृदयाची गती मंदावते आणि रक्तवाहिन्या शिथिल होतात.

» हृदयविकाराचा झटका, पक्षाघाताचा धोका कमी : सततच्या तणावामुळे शरीरातील दाह आणि रक्तदाब वाढू शकतो, ज्यामुळे हृदयविकाराचा झटका आणि पक्षाघाताचा धोका वाढतो. नियमित ध्यान हे धोके कमी करण्यास मदत करू शकते, ज्यामुळे हृदयविकाराचा झटका आणि पक्षाघातासारख्या गंभीर आजारांचा धोका कमी होतो.



» ध्यानामुळे मानसिक आरोग्य सुधारते : मानसिक आरोग्याचा शारीरिक आरोग्यावरही परिणाम होतो. मनाच्या शांतीच्या अभावामुळे हृदयाच्या आरोग्यावरही परिणाम होऊ शकतो. ध्यान हे हृदयाचे आरोग्य आणि मानसिक आरोग्य या दोन्हीसाठी फायदेशीर आहे. नियमित ध्यानामुळे चिंता, तणाव आणि झोपेच्या समस्या कमी होण्यास मदत होते.

» ध्यान महत्त्वाचे का आहे? : ध्यान ही एक सोपी पण अत्यंत प्रभावी पद्धत आहे जी हृदय आणि मन या दोन्हींचे आरोग्य राखण्यास मदत करू शकते. जर तुम्ही ध्यानाचा तुमच्या दैनंदिन दिनचर्येत समावेश केला, तर ते एका चांगल्या जीवनशैलीच्या दिशेने एक मोठे पाऊल ठरू शकते.

# एसटी महामंडळाच्या 'राजमाता जिजाऊ' बस सेवेचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते लोकार्पण

**मुंबई(प्रतिनिधी)** –महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या ताफ्यात अत्याधुनिक सुविधांनी सज्ज 'राजमाता जिजाऊ' या बससेवेचा लोकार्पण सोहळा पार पडला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते या नव्या बससेवेची आजपासून सुरुवात करण्यात आली.

विधानभवन प्रांगणात पार पडलेल्या बससेवा लोकार्पण सोहळ्यास उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार, परिवहन मंत्री प्रताप सरनाईक, पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे, शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे, राज्यमंत्री माधुरी मिसाळ, दोन्ही विधीमंडळाचे सदस्य, परिवहन विभागाचे अप्पर मुख्य सचिव संजय सेठी, एसटी महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक माधव कुसेकर, अशोक लेलँडचे वरिष्ठ व्यवस्थापक जॉन मॅथ्यू, टाटा मोटर्सचे ग्लोबल हेड सुशांत नाईक आदी उपस्थित होते.






'राजमाता जिजाऊ' या नावाने सुरू करण्यात आलेली ही बससेवा महाराष्ट्राच्या वैभवशाली इतिहासाची आठवण करून देणारी असून, राजमाता जिजाऊ यांच्या प्रेरणादायी कार्याला अभिवादन करणारी आहे. हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जडणघडणीत महत्त्वाची भूमिका बजावणाऱ्या राजमाता जिजाऊंच्या स्मरणार्थ ही बससेवा सुरू करण्यात आली आहे. या नव्या उपक्रमांतर्गत सुमारे ३ हजार बसेस राज्यभरात टप्प्याटप्प्याने दाखल होणार असून, प्रवाशांना अधिक सुरक्षित, आरामदायी आणि आधुनिक प्रवासाचा अनुभव मिळणार आहे. एसटी महामंडळाच्या ताफ्यात यापूर्वी 'शिवनेरी', 'शिवशाही', 'शिवाई', 'हिरकणी' आणि 'यशवंती' अशा विविध सेवांचा समावेश असून, 'राजमाता जिजाऊ' ही बससेवा त्या मालिकेत आणखी एक महत्त्वाची भर असणार आहे. या उपक्रमामुळे राज्यातील सार्वजनिक परिवहन अधिक सक्षम आणि प्रवासी-केंद्रित होण्यास मदत होणार आहे.

मुख्यमंत्री फडणवीस तसेच उपमुख्यमंत्री शिंदे, उपमुख्यमंत्री श्रीमती पवार यांनी बसचे पूजन करून आणि फीत कापून या सेवेचा शुभारंभ केला. या बससेवेचे लोकार्पण झाल्यानंतर उपस्थित मान्यवरांनी बसमधून प्रवास करत बससेवेची सुरूवात केली. यावेळी बसच्या समोर प्रतिकात्मक स्वरूपात घोड्यावर आरूढ झालेल्या राजमाता जिजाऊ यांच्या देखाव्यामुळे हा लोकार्पण सोहळा ऐतिहासिक आणि प्रेरणादायी ठरला.

# विकासकामांना गती देण्यासाठी प्रशासनाने अधिक जबाबदारीने कार्य करावे -विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर

**छत्रपती संभाजीनगर (प्रतिनिधी)** –विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर यांनी आज विभागातील सर्व जिल्हाधिकारी व नगरपालिकांच्या मुख्याधिकारी यांची बैठक घेऊन नगरपालिका प्रशासनातील प्रलंबित मुद्यांचा सविस्तर आढावा घेतला. नगरपालिका क्षेत्रातील मूलभूत सुविधांची गुणवत्ता सुधारण्यासाठी तसेच विकासकामांना गती देण्यासाठी प्रशासनाने अधिक जबाबदारीने कार्य करावे, असे स्पष्ट निर्देश त्यांनी दिले.

विभागीय आयुक्त कार्यालयात आयोजित आढावा बैठकीला नगर प्रशासन विभागाचे सह आयुक्त देविदास टेकाळे उपस्थित होते. तर दुरदृश्य प्रणालीव्दारे विभागातील जिल्हाधिकारी, नगर परिषदांचे मुख्याधिकारी उपस्थित होते. पाणीपुरवठा, स्वच्छता, मालमत्ता कर व पाणीपट्टी वसुली, नागरी पायाभूत सुविधा, प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) २.० तसेच 'नमो उद्यान' स्पर्धा यांसह विविध विषयांवर सखोल चर्चा करण्यात आली. प्रलंबित प्रस्तावांची स्थिती, निधीचा वापर आणि अंमलबजावणीतील अडचणींचा आढावा घेऊन संबंधित अधिकाऱ्यांना कामकाजात गती आणण्याचे निर्देश देण्यात आले.

प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) २.० अंतर्गत मंजूर व प्रलंबित घरकुलांची माहिती तपासून प्रलंबित प्रकरणे तातडीने निकाली काढण्यावर भर देण्यात आला. जिओ-टॅगिंग व एमआयएस प्रणाली अद्ययावत ठेवून पारदर्शकता वाढविणे आणि लाभार्थ्यांपर्यंत योजनेचा प्रभावी लाभ पोहोचविणे आवश्यक असल्याचे विभागीय आयुक्तांनी नमूद केले. सर्वांसाठी घर हे उद्दिष्ट निश्चित कालमर्यादेत पूर्ण करण्यासाठी सर्व यंत्रणांनी समन्वयाने काम करावे, असे आवाहनही त्यांनी केले.

## Change In Name

**My old name is Pralahad Nardewad which is now I am changing as New Name Pralhad Nardewad. Hence forth my all correspondance will be done as per my new name, Please consider the same.**
**Address - S/o. Gangadhar Nardewad H.No. 256, Masjid Galli, Bamni Bk., Nanded, Maharashtra-431710**

# भोकर नगरपरिषद, भोकर जि. नांदेड

**मुख्य प्रभागीय इमारत**

**साईबाबा पेट्रोल समोर नांदेड रोड भोकर ता. भोकर, जि. नांदेड- ४३१८०१**

## ई-निविदा सूचना
## (पाणीपुरवठा विभाग)
## (२०२६-२७)

मुख्याधिकारी, नगर परिषद भोकर जि. नांदेड यांच्या वतीने भोकर नगरपरिषद अंतर्गत मन २०२६-२७ या आर्थिक वर्ष करिता पाणीपुरवठा विभागासाठी लागणारे सर्व साहित्य पुरवठा करणे.. सबमर्शिबल मोटार, इतर पंप व अनुषधिक सर्व दुरुस्ती करणे व तुरटी, ब्लिचिंग पावडर पुरवठाचा करणे या एकूण ०३ (तिन) कामाकरिता ई-निविदा महाराष्ट्र शासनाच्या http://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर कार्यालयीन वेळेत दि. २५/०३/२०२६ ने दि. ०१/०४/२०२६ पर्यंत मागविण्यात येत आहेत.

दिनांक २४/०३/२०२६

**स्वाक्षरित**
**मुख्याधिकारी**
**नगर परिषद भोकर जि. नांदेड**

## Change In Name

**My old name is VARSHA SHANKAR PILGUNDE which is now I am changing as New Name VARSH SHANKAR PILGUNDE Hence forth my all correspondance will be done as per my new name, Please consider the same. Address - Near Hanuman Mandir Lalwandi Post Gadga, Dist. Nanded Maharashtra-431722**

**नगरपरिषद, भोकर जि. नांदेड.**
**जाहीर प्रगटन**
**(नाव परिवर्तन करणे बाबत)**

या जाहीर प्रगटनाआधारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, बसवेश्वर नारायणराव दंडवे यांनी या कार्यालयात अर्ज सादर करून भोकर नगरपरिषद हद्दीतील शेत सर्वे नं. (...), गट नं. (१२१), जुना वार्ड नं. (०५) मधील प्लॉट नं. (४४) मालमत्ता नं. (आय-८५/७७) नवीन वार्ड क्र. (०३) नवीन मालमत्ता नं. (७४९/७७) साईज पूर्व-पश्चिम...दक्षिण-उत्तर....

चर्तुः सिमा :- पूर्वेस : प्लॉट नं. ४५, पश्चिमेस : २३ फुट रस्ता, दक्षिणेस : पांदण रस्ता, उत्तरेस : प्लॉट नं. ४३.

लक्ष्मीकांत नारायण देशपांडे यांच्या नावाने असलेली मालमत्ता खरेदी खताआधारे / वारसा आधारे माझ्या नावे नाव परिवर्तन करण्यात यावे, अशी विनंती संचिका सादर केली आहे. तरी त्यांचे नांव कर आकारणी नोंद वहित घेण्यात येत आहे. त्या संबंधी कोणास काही आक्षेप असल्यास त्यांनी ०७ दिवसांच्या आत लेखी पुराव्यासह अर्ज सादर करावा, अन्यथा मुदतीनंतर कुणाचे काहीही आक्षेप नाहीत, असे गृहित धरून खरेदीखताच्या आधारे त्यांच्या नावाने सदर मालमत्तेची नोंद कर आकारणी नोंद वहित घेण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

**मुख्याधिकारी**
**नगरपरिषद, भोकर**

**नगरपरिषद, भोकर जि. नांदेड.**
**जाहीर प्रगटन**
**(नाव परिवर्तन करणे बाबत)**

या जाहीर प्रगटनाआधारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, वैभव भगवानराव दंडवे यांनी या कार्यालयात अर्ज सादर करून भोकर नगरपरिषद हद्दीतील शेत सर्वे नं. (....), गट नं. (१२१), जुना वार्ड नं. (०५) मधील प्लॉट नं. (१) मालमत्ता नं. (आय-८५/३४) नवीन वार्ड क्र. (०१) नवीन मालमत्ता नं. (७४९/३४) साईज पूर्व-पश्चिम...दक्षिण-उत्तर .... चर्तुः सिमा :-
पूर्वेस : प्लॉट नं. ०२
पश्चिमेस : शहाणे यांचे शेत
दक्षिणेस : पांदण
उत्तरेस : प्लॉट नं. ६

लक्ष्मीकांत नारायण देशपांडे यांच्या नावाने असलेली मालमत्ता खरेदी खताआधारे / वारसा आधारे माझ्या नावे नाव परिवर्तन करण्यात यावे, अशी विनंती संचिका सादर केली आहे. तरी त्यांचे नांव कर आकारणी नोंद वहित घेण्यात येत आहे. त्या संबंधी कोणास काही आक्षेप असल्यास त्यांनी ०७ दिवसांच्या आत लेखी पुराव्यासह अर्ज सादर करावा, अन्यथा मुदतीनंतर कुणाचे काहीही आक्षेप नाहीत, असे गृहित धरून खरेदीखताच्या आधारे त्यांच्या नावाने सदर मालमत्तेची नोंद कर आकारणी नोंद वहित घेण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

**मुख्याधिकारी**
**नगरपरिषद, भोकर**

## जाहीर प्रगटन

सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, बिलोली यांचे न्यायालय
किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक ७३ / २०२६
निरंजन विरुध्द निरंक

अर्जदार : निरंजन पि. गंगाराम कांबळे, वय-६४ वर्षे, रा. लोहगाव ता. बिलोली, जि. नांदेड
विरुद्ध
निरंक

विषय :- वारसा प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्याअर्थी अर्जदारांनी या न्यायालयात अर्ज सादर केला असून त्यात असे कथन केले आहे की, मयत कोंडीबा गंगाराम कांबळे यांचे अर्जदार हा सख्खा भाऊ आहे. अर्जदार हे मौजे लोहगाव ता. बिलोली, जि.नांदेड येथील रहिवाशी आहेत.

मयत कोंडीबा गंगाराम कांबळे यांचा मृत्यू दिनांक दि. ०१/१२/२०१५ रोजी मौ. लोहगाव येथे झाला आहे. अर्जदाराची बहीण नामे शांताबाई सदावर्ते ही सुध्दा मयत पावली आहे व मयताचे आई व वडील यांचा सुध्दा मृत्यू झाला आहे. मयत कोंडीबा गंगाराम कांबळे हा अविवाहित आहे. मयताच्या पश्चात अर्जदार हेच मयताचे कायदेशीर वारस असून इतर कोणीही मयताचे वारस नाहीत असे अर्जदारांचे म्हणणे आहे.

हे की, मयत कोंडीबा गंगाराम कांबळे यांचे कायदेशीर वारस म्हणून वारसा प्रमाणपत्र मिळणे बाबत अर्जदारांनी या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे. तरी उपरोक्त प्रकरणी सर्व संबंधितास कळविण्यात येते की, वरील अर्जदाराच्या नावे वारसा प्रमाणपत्र देणे बाबत कोणास काही आक्षेप असल्यास त्यांनी तो लेखी स्वरूपात स्वतः हजर राहून अथवा त्यांचे विधिज्ञ यांचे मार्फत दिनांक ३०/०४/२०२६ रोजी किंवा तत्पूर्वी या न्यायालयात सादर करावा. अन्यथा कोणासही काही आक्षेप/उजर नाही असे समजुन प्रकरणात पुढील कायदेशीर आदेश निर्गमीत करण्यात येतील. आज दि. १७ मार्च, २०२६ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्याने देण्यात आले.

सहा. अधिक्षक
सह दिवाणी न्यायालय क. स्तर, बिलोली

## Change In Name

**My old Name is NUSRATH SULTANA MAZHARUDDIN Which now I am changing as New Name NUSRATH SULTANA MOHAMMED MAZHARUDDIN Hence forth My all correspondence will be done as per My Name please consider the same. Address-DHANEGAON Mujampeth Juna KAUTHA VASARNI NANDED-431603 Mo. No. 8149612122**

## भोंदूबाबा अशोक खरातला २९ मार्चपर्यंत पोलीस कोठडी

**मुंबई (प्रतिनिधी)** – नाशिकमध्ये गाजत असलेल्या महिला लैंगिक अत्याचार प्रकरणात आरोपी अशोक खरात याला न्यायालयाने २९ मार्चपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे. कोठडीची मुदत संपल्यानंतर आज त्याला न्यायालयात हजर करण्यात आले होते. तपासासाठी अधिक वेळ आवश्यक असल्याचे सांगत सरकारी पक्षाने कोठडी वाढवण्याची मागणी केली होती, जी न्यायालयाने मान्य केली.

खरातला न्यायालयात आणण्यापूर्वी त्याची जिल्हा रुग्णालयात वैद्यकीय तपासणी करण्यात आली. त्यानंतर कडेकोट पोलीस बंदोबस्तात त्याला कोर्टात हजर करण्यात आले. प्रकरणाच्या संवेदनशीलतेमुळे न्यायालय परिसरात मोठ्या प्रमाणात पोलीस तैनात करण्यात आले होते. सुनावणीदरम्यान वकिलांचीही मोठी उपस्थिती पाहायला मिळाली.

सुनावणीदरम्यान एसआयटी अधिकारी किरणकुमार सूर्यवंशी यांनी तपासातील महत्त्वाची माहिती न्यायालयासमोर मांडली. आरोपी महिलांना खडे, पेढे देत असे तसेच पाण्यात काही पदार्थ मिसळून देत असे, ज्यामुळे त्या अस्वस्थ होत आणि त्यानंतर त्यांचे शोषण केले जात असल्याचा गंभीर आरोप करण्यात आला.

**नगरपरिषद, भोकर जि. नांदेड.**
**जाहीर प्रगटन**
**(नाव परिवर्तन करणे बाबत)**

या जाहीर प्रगटनाआधारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, सुवर्णाबाई अशोक राचूटकर यांनी या कार्यालयात अर्ज सादर करून भोकर नगरपरिषद हद्दीतील शेत सर्वे नं. (...), गट नं. (२८८), जुना वार्ड नं. (०५) मधील प्लॉट नं. (२१) मालमत्ता नं. (डी-३०१/३९) नवीन वार्ड क्र. (१६) नवीन मालमत्ता नं. (१६३८/३९) साईज पूर्व-पश्चिम-१२.८२ मीटर, दक्षिण-उत्तर-९.४९ मीटर. चर्तुः सिमा - पूर्वेस : प्लॉट नं. २०, पश्चिमेस : ४.५ मीटरचा रस्ता, दक्षिणेस : प्लॉट नं. २२, उत्तरेस : ५ मीटरचा रस्ता.

गोविंद जगदेवराव कदम यांच्या नावाने असलेली मालमत्ता खरेदी खताआधारे/वारसा आधारे माझ्या नावे नाव परिवर्तन करण्यात यावे, अशी विनंती संचिका सादर केली आहे. तरी त्यांचे नांव कर आकारणी नोंद वहित घेण्यात येत आहे. त्या संबंधी कोणास काही आक्षेप असल्यास त्यांनी ०७ दिवसांच्या आत लेखी पुराव्यासह अर्ज सादर करावा, अन्यथा मुदतीनंतर कुणाचे काहीही आक्षेप नाहीत, असे गृहित धरून खरेदीखताच्या आधारे त्यांच्या नावाने सदर मालमत्तेची नोंद कर आकारणी नोंद वहित घेण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

**मुख्याधिकारी**
**नगरपरिषद, भोकर**

**नगरपरिषद, भोकर जि. नांदेड.**
**जाहीर प्रगटन**
**(नाव परिवर्तन करणे बाबत)**

या जाहीर प्रगटनाआधारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, विठ्ठलराव जळबाजी माचनवार यांनी या कार्यालयात अर्ज सादर करून भोकर नगरपरिषद हद्दीतील शेत सर्वे नं. (...), गट नं. (१२१), जुना वार्ड नं. (०५) मधील प्लॉट नं. (२१) मालमत्ता नं. (आय-८५/५५) नवीन वार्ड क्र. (०३) नवीन मालमत्ता नं. (७४९/५५) साईज पूर्व-पश्चिम-९.१४ मीटर, दक्षिण-उत्तर-१२.१९ मीटर. चर्तुः सिमा :- पूर्वेस : २३ फुट रस्ता, पश्चिमेस : प्लॉट नं. २०, दक्षिणेस : २० फुट रस्ता, उत्तरेस : प्लॉट नं. २२.

लक्ष्मीकांत नारायण देशपांडे यांच्या नावाने असलेली मालमत्ता खरेदी खताआधारे / वारसा आधारे माझ्या नावे नाव परिवर्तन करण्यात यावे, अशी विनंती संचिका सादर केली आहे. तरी त्यांचे नांव कर आकारणी नोंद वहित घेण्यात येत आहे. त्या संबंधी कोणास काही आक्षेप असल्यास त्यांनी ०७ दिवसांच्या आत लेखी पुराव्यासह अर्ज सादर करावा, अन्यथा मुदतीनंतर कुणाचे काहीही आक्षेप नाहीत, असे गृहित धरून खरेदीखताच्या आधारे त्यांच्या नावाने सदर मालमत्तेची नोंद कर आकारणी नोंद वहित घेण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

**मुख्याधिकारी**
**नगरपरिषद, भोकर**

**नगरपरिषद, भोकर जि. नांदेड.**
**जाहीर प्रगटन**
**(नाव परिवर्तन करणे बाबत)**

या जाहीर प्रगटनाआधारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, श्रेयस लक्ष्मण दंडवे यांनी या कार्यालयात अर्ज सादर करून भोकर नगरपरिषद हद्दीतील शेत सर्वे नं. (...), गट नं. (१२१), जुना वार्ड नं. (०५) मधील प्लॉट नं. (--) मालमत्ता नं. (आय-८५/४०) नवीन वार्ड क्र. (०३) नवीन मालमत्ता नं. (७४९/४०) साईज पूर्व-पश्चिम-९.१४ मीटर, दक्षिण-उत्तर-१२.१९ मीटर.

चर्तुः सिमा :- पूर्वेस : प्लॉट नं. ०८, पश्चिमेस : शहाणे यांचे शेत, दक्षिणेस : २० फुट रस्ता, उत्तरेस : प्लॉट नं. १२.

लक्ष्मीकांत नारायण देशपांडे यांच्या नावाने असलेली मालमत्ता खरेदी खताआधारे / वारसा आधारे माझ्या नावे नाव परिवर्तन करण्यात यावे, अशी विनंती संचिका सादर केली आहे. तरी त्यांचे नांव कर आकारणी नोंद वहित घेण्यात येत आहे. त्या संबंधी कोणास काही आक्षेप असल्यास त्यांनी ०७ दिवसांच्या आत लेखी पुराव्यासह अर्ज सादर करावा, अन्यथा मुदतीनंतर कुणाचे काहीही आक्षेप नाहीत, असे गृहित धरून खरेदीखताच्या आधारे त्यांच्या नावाने सदर मालमत्तेची नोंद कर आकारणी नोंद वहित घेण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

**मुख्याधिकारी**
**नगरपरिषद, भोकर**

## जाहीर प्रगटन

सर्व जनतेस या जाहीर प्रगटनाद्वारे कळविण्यात येते की, श्री शरणशांती वर्धक संस्था हणेगाव, ता. देगलूर, जि. नांदेड नोंदणी क्र. एफ.(२४४) नांदेड या संस्थेच्या मालकीची जमीन गट क्र. ३६५ क्षेत्रफळ ३२.०० हेक्टर (८० एकर जमीन) स्थित मौजे हणेगाव ता. देगलूर, जि. नांदेड ही जमीन पाडवा सन २०२६-२०२७ या एका वर्षासाठी लावण (खंडाणे) द्यावयाची आहे. तरी ज्या शेतकऱ्यांना लावण करण्याची इच्छा असेल त्यांनी दिनांक १/४/२०२६ रोजी संस्थेच्या कार्यालयात उपस्थित राहून जाहीर लिलावात भाग घ्यावा. लिलावाच्या अटी व शर्ती खालीलप्रमाणे राहतील. १. संस्थेची जमीन गट क्र. ३६५ क्षेत्रफळ ३२.०० हेक्टर ही पाडवा २०२६-२७ या एका वर्षासाठी लावण राहील. २. संस्थेच्या जमिनीचे धुरे, बंधारे, संस्थेच्या परवानगीशिवाय नासधूस करू नये. ३. संस्थेच्या जमिनीवरील झाडे संस्थेच्या परवानगीशिवाय तोडू नये. ४. लिलावात भाग घेणाऱ्यांनी रुपये १० हजार डिपॉझिट ठेवून बोलू बोलता येणार आहे. ५. लिलावाची रक्कम अपेक्षेपेक्षा कमी आल्यास दुबार जाहीर लिलाव करण्यात येईल. ६. लिलावाची प्रक्रिया संपल्यानंतर १ महिन्याच्या आत लिलावातील उर्वरित रक्कम संस्थेकडे जमा करण्यात येईल अन्यथा लिलाव रद्द करण्यात येईल. ७. लिलाव संस्थेच्या विश्वस्थ मंडळामार्फत होईल. लिलाव रद्द करण्याचा अधिकार संस्थेच्या विश्वस्थ मंडळात राहील. ८. लिलावाची प्रक्रिया ही धर्मदाय उपायुक्त नांदेड यांच्या कार्यालयातील निरीक्षकांच्या उपस्थितीत होईल. ज्या कोणी इच्छुकांना जाहीर लिलावात भाग घ्यायचा आहे त्यांनी वरील अटी व शर्तीच्या अधीन राहून लिलावात भाग घ्यावा.

जाहीर लिलाव दिनांक १/४/२०२६ रोजी होईल.
जाहीर लिलावाचे स्थळ- शरणशांती वर्धक संस्था हणेगाव, ता. देगलूर, जि. नांदेड

जाहीर प्रगटन देणार
सचिव/विश्वस्त मंडळ
शरणशांती वर्धक संस्था हणेगाव,
ता. देगलूर, जि. नांदेड

## Change In Name

**My old Name is SARALA/ SARLA SHRISHRIMAL Which now I am changing as New Name SARLA MANOJKUMAR SHRISHRIMAL Hence forth My all correspondence will be done as per My Name please consider the same. Address. SARLA SHRISHRIMAL Nava Mondha Nanded-431601 Mo. No. 9763221223**

## Change In Name

**My old Name is SARLABAI SHRISHRIMAL Which now I am changing as New Name SARLA MANOJKUMAR SHRISHRIMAL Hence forth My all correspondence will be done as per My Name please consider the same. Address. SARLA SHRISHRIMAL Nava Mondha Nanded-431601 Mo. No. 9763221223**

## जाहीर प्रगटन

ज्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यास येते की, अर्जदार हुसेन फकिरसाब कुरेशी, वय ६१ धंदा - शेतमजुरी रा. बिलोली ता. बिलोली यांनी या कार्यालयात हजर राहून जन्म, मृत्यू नोंदणी (सुधारणा) कायदा २०२३ मधील कलम ११ (२) व (३) अन्वये दि. १८/०८/२०२५ रोजी जन्म नोंद घेण्यासाठी अर्ज दाखल केला आहे.

अर्जदार हुसेन फकिरसाब कुरेशी, रा. बिलोली, ता. बिलोली यांचा जन्म दि. १५/०६/१९६४ रोजीची नोंद मुख्याधिकारी, नगर परिषद बिलोली ता बिलोली जि. नांदेड येथे उपलब्ध नाही.

ज्याअर्थी या जाहीर प्रगटनाद्वारे सर्व जनतेस व संबंधितास कळविण्यात येते की, हुसेन फकिरसाब कुरेशी यांच्या जन्माची नोंद घेण्यासाठी कोणाचा काही आक्षेप अथवा उजर असल्यास त्यांनी जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून पंधरा दिवसात या न्यायालयात स्वतः किंवा वकीलामार्फत हजर राहून आपला आक्षेप नोंदवावा. विहित कालावधीत हजर राहून आक्षेप किंवा उजर न केल्यास सदरच्या अर्जावर एकतर्फी आदेश पारित करण्यात येईल.

आज दिनांक १२/०३/२०२६ रोजी माझ्या सहीनिशी व या कार्यालयाच्या शिक्क्यानिशी जाहीर प्रगटन प्रसिद्ध करण्यात येत आहे.

**तालुका कार्यकारी दंडाधिकारी**
**बिलोली**

## जाहीर प्रगटन

जाहीर प्रगटन देण्यात येते की, मौ. असदुल्लाबाद ता. जि. नांदेड नांदेड वाघाळा महानगरपालिका नांदेड येथील वसती लक्ष्मीनगर येथील सर्व्हे नं. ४१/१ सिटी सर्व्हे नं. १०२८२ पैकी प्लॉट नं. ७५ चा भाग ज्याचा नवीन सिटी सर्व्हे नं. १८६५६ असून, त्या वरील आर्या हाईट्स अपार्टमेंटमधील १ तळमजल्यावरील फ्लॅट (सदनिका ०८) आहे.

१. लिहून देणार-श्री विजय नागेश गुंजकर रजिस्ट्री नं. १९२४ दिनांक १२/३/२०२३

२. लिहून देणार-सौ. धनश्री यदुराज कदम व श्री यदुराज प्रभू कदम रजिस्ट्री नं. ७४३८ दिनांक २१/७/२०२३

लिहून घेणार-श्री किरणकुमार उत्तम मेतलवाड

रजिस्ट्रर्ड सौदाचिठ्ठी विक्रीचा करारनामा दस्तऐवज अ. न. द. ग. २.५४० दिनांक २१ जानेवारी २०२६ व तसेच श्री विजय नागेश गुंजकर वरील मालमत्तेची मूळ कॉपी मिळत नाही म्हणून जाहीर प्रगटन देण्यात येते की, ७ दिवसांत ऑनर क्र. २ यांना नाही दिल्यास बँक भारतीय नागरिक आपले काही म्हणणे नाही असे गृहीत धरून श्री किरणकुमार उत्तम मेतलवाड ऑनर क्र. १ व २ चे काही घेणे-देणे नाही असे समजून पुढील रजिस्ट्री करून घेतील. करिता हे जाहीर प्रगटन देण्यात येत आहे.

जाहीर प्रगटन देणार
किरणकुमार उत्तम मेतलवाड
मो. ९९२३६१४८५९


## कुत्रीचे पिल्ले विकणे आहे

डॉबर मॅन, जर्मन शेफर्ड, ग्रेडन, लेब्रा डॉग, पामोलियन इत्यादी १२० प्रकारच्या जातीची कुत्रीचे पिल्ले मिळतील.

संपर्क गोपालअण्णा
डॉग डिलर
मोबाईल नंबर
९८५०६८८५२८



## रामबाण ईलाज

वात रोगावर, गुडघेदुखी, संधीवात, आमवात, मनक्यात गॅप येणे, नस दबणे यावर खात्रीशीर ईलाज.

:: पत्ता ::

**सेवा क्लिनीक**

गणराज फर्निचरच्या बाजुला मेन रोड तुप्पा पाटी, नांदेड -९

संपर्क : डॉ. सय्यद ताहेर, मो. ९६७३५५१९००, ९७६७७१९१०१

तसेच दवाखान्यात बीएएमएस महिला डॉक्टरची नेमणूक करणे आहे.



# गोदातीर समाचार



## पेस्टोमॅटीक कंट्रोल सर्व्हीस

हर्बल ट्रिटमेंट

१६ वर्षांपासून नांदेडकरांच्या सेवेत...



किडे, मुंग्या, मुंगळे, झुरळ, पाल, उंदीर, ढेकून, साप, कबुतर, वाळवी, मधपोळे इत्यादींचा खात्रीशीर उपाय. कामाचा कुठलाही साईड इफेक्ट नाही. त्रास नाही, वास नाही.

पूर्णा रोड, बी.एस.एन.एल. ऑफिससमोर नांदेड

मो. 9284804221, 9637704308




## नांदेड शहराला 'क्षयमुक्त' करण्यासाठी सहकार्य करा -महापौर कविता मुळे

### क्षयरोग जनजागृतीसाठी पालिकेच्यावतीने रॅलीचे आयोजन

**नांदेड (प्रतिनिधी)**– पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या 'क्षयमुक्त भारत' संकल्पनेला गती देण्यासाठी आणि नांदेड शहराला पूर्णपणे टीबीमुक्त करण्यासाठी नांदेड-वाघाळा शहर महानगरपालिकेच्यावतीने विशेष मोहीम राबवण्यात येत आहे. या मोहिमेत नांदेडकरांनी सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहन महापौर कविता संतोष मुळे यांनी केले आहे. स्वच्छ आणि सुंदर नांदेडसोबतच आरोग्यदायी नांदेड हे आमचे ध्येय आहे. प्रत्येक नागरिकाच्या सहभागातूनच आपण शहराला क्षयमुक्त करू शकू, असा विश्वास यावेळी महापौरांनी व्यक्त केला आहे. यावेळी पालिका आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे यांची सुद्धा प्रमुख उपस्थिती होती.

नांदेड शहर हे क्षयमुक्त करण्यासाठी सर्व नांदेड वासियांनी क्षय रोगाची तपासणी करून नांदेड हे क्षयमुक्त करण्याच्या दृष्टीकोणातून 'जन भागीदारी' च्या संकल्पनेतून नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या वतीने मंगळवार, दि. २४ मार्च हा 'जागतिक क्षयरोग दिन' साजरा करण्यात आला. यानिमित्त शहरातील नागरिकांमध्ये जनजागृती करण्यासाठी एका रॅलीचे आयोजन करण्यात आले होते.

या प्रसंगी महपौर व प्रमुख पाहुणे यांनी महात्मा फुले पुतळा येथून निघणाऱ्या रॅलीला हिरवी झेंडी दाखवून रॅलीची सुरुवात केली. त्याचप्रमाणे या प्रसंगी मान्यवरांनी व उपस्थित सर्व आरोग्य कर्मचारी यांनी टीबी मुक्त व क्षयरोग निर्मूलनाची शपथ घेऊन सामुहिक स्वाक्षरी मोहिमेचा उपक्रम राबविण्यात आला.

सदरील रॅली सकाळी ठीक ८.३० वाजता आय.टी.आय. जवळील महात्मा फुले यांच्या पुतळ्यापासून ते जंगमवाडी दवाखाना या मार्गावर काढण्यात आली. रॅलीमध्ये सहभागी वैद्यकीय अधिकारी, सुपरवायझर व सर्व आशा वर्कर तसेच जी. डी. गोएंका हेल्थकेअर अकॅडमी व स्वामी विवेकानंद नर्सिंग स्कूल नांदेडचे शिक्षक व सर्व प्रशिक्षणार्थी विद्यार्थी सहभागी झाले होते. या सर्वांनी रॅलीमध्ये क्षयरोग निर्मूलनाचे फलक हातात धरून घोषणांच्या माध्यमातून जनजागृती केली.

याप्रसंगी शहरातील जास्तीत जास्त क्षय रुग्णांना शोधून उपचारासाठी आणण्याचे काम करणारे खाजगी वैद्यकीय व्यावसायिक डॉ. मृत्युंजय महिंद्रकर, डॉ. भरत तोष्णीवाल,



डॉ. समीर कोटलवार यांचा उत्कृष्ट कार्य केल्याबद्दल सन्मान चिन्ह देवून सत्कार करण्यात आला. तसेच नांदेड शहरामध्ये आरोग्य सेवा देणाऱ्या उत्कृष्ट आशाताई, NTEP विभागात उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या कर्मचारी विवेकानंद हाळीकर, रवींद्रकुमार कावडे व कृष्णा भुसेवाड यांचा सन्मानचिन्ह देवून सत्कार करण्यात आला.

या कार्यक्रमास महापौर कविता मुळे, पालिका आयुक्त डॉ. महेश डोईफोडे हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. त्याचप्रमाणे उपमहापौर दीपकसिंह रावत, सभागृहनेता ॲड. महेश कनकदंडे, अतिरिक्त आयुक्त निलेश सुंकेवर, अतिरिक्त आयुक्त गिरीश कदम, उपायुक्त अजितपालसिंघ संधु, वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. हनुमंत रिठे, डॉ. प्रतिमा कदम, उपवैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. बालाप्रसाद कुंटूरकर, शहर क्षयरोग अधिकारी डॉ. मो. बदीयोद्दिन यांच्यासह सर्व प्रमुख पदाधिकारी आणि कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## स्वारातीम विद्यापीठात इंग्रजी संवाद कौशल्याचा प्रमाणपत्र अभ्यासक्रम सुरू

**नांदेड (प्रतिनिधी)** –वर्क फ्रॉम होम आणि ऑफिसच्या व्यस्त आवर्तनात इंग्रजीत संवाद साधणे, लिहिणे आणि बोलणे सोपे करण्यासाठी स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठातील संवाद कौशल्य केंद्राने एक नवीन ब्लेंडेड (ऑनलाइन + ऑफलाइन) अभ्यासक्रम सुरू केला आहे. 'सर्टिफिकेट कोर्स इन इंग्लिश फॉर कम्युनिकेशन' या अभ्यासक्रमाद्वारे विद्यार्थी, गृहिणी, कर्मचारी, अधिकारी व प्रशासकीय सहकाऱ्यांना सहजरित्या इंग्रजीचे व्यावसायिक प्रशिक्षण मिळेल, अशी माहिती विद्यापीठाचे प्र. कुलसचिव प्रा. ज्ञानेश्वर पवार यांनी दिली.

एप्रिल ते जून दरम्यान चालणाऱ्या या तीन महिन्यांच्या (एकूण ६० तास) कार्यक्रमात ऐकणे, बोलणे, वाचन आणि लेखन या चारही कौशल्यांवर लक्ष केंद्रित करण्यात आले आहे. बारावी उत्तीर्ण असलेली कोणतीही व्यक्ती हा अभ्यासक्रम पूर्ण करू शकते.

अभ्यासक्रमाची उद्दिष्टे म्हणजे औपचारिक आणि अनौपचारिक संभाषणात आत्मविश्वास निर्माण करणे, शब्दसंपत्ती वाढवणे आणि विश्लेषणात्मक विचारसरणी विकसित करणे.




विशेषतः स्पर्धा परीक्षा व व्यवसायासाठी हा अभ्यासक्रम उपयोगी ठरणार आहे. विविध ठिकाणच्या तज्ज्ञ मार्गदर्शकांच्या मदतीने इंग्रजी शिकण्याची ही दुर्मिळ संधी आहे.

दैनंदिन व्यवहारात इंग्रजीचा प्रभावी वापर करून करिअरला गती देण्यासाठी हा अभ्यासक्रम उपयुक्त ठरेल. इच्छुक उमेदवारांनी प्रा. दिलीप चव्हाण (संवाद कौशल्य केंद्र) यांच्याशी ९४२०६४१५१९ या क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन विद्यापीठाद्वारे करण्यात आले आहे.

## श्री साईबाबा मंदिर कौठा येथे श्रीराम नवमी उत्सवाचे आयोजन

**नांदेड (प्रतिनिधी)** –येथील श्री साईबाबा मंदिर व गोशाळा कौठा येथे गुरुवार, दि. २६ मार्च रोजी श्रीराम नवमी उत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे.

यानिमित्त सकाळी ६ ते ८ रूद्राभिषेक, सकाळी ९ ते १० श्रींची पालखी मिरवणूक, सकाळी ८ ते १०.३० लक्ष्मीकांत लिंगाडे संचलित स्वरगंध संगीतमंच प्रस्तुत भक्ती संगीत, सकाळी १०.३० ते ११.३० ह.भ.प. श्री राम महाराज पांगरीकर अध्यक्ष आम्ही वारकरी सेवाभावी संस्था यांची श्रीराम कथा, दुपारी १२ वाजता श्रीराम जन्मोत्सव व आरती तसेच दुपारी १ ते ५ महाप्रसाद भंडारा आणि सोबत भक्ती संगीताचा कार्यक्रम होणार आहे. तरी भाविकांनी श्रवणाचा, दर्शनाचा व महाप्रसादाचा लाभ घ्यावा, असे आवाहन विश्वस्त मंडळ श्री साईबाबा मंदिर व गोशाळा कौठा नांदेडच्यावतीने करण्यात आले आहे.

## हिमायतनगर पोलिसांच्या कारवाईत पाच लाखांचा गुटखा जप्त; एकाला केली अटक

**नांदेड (प्रतिनिधी)** –हिमायतनगर तालुक्यातील पोटा येथे पोलिसांनी कारवाई करून सय्यद सत्तार सय्यद खादर याला अटक करून त्याच्या ताब्यातून पाच लाख रुपयांचा अवैध गुटखा जप्त केला आहे. ही कारवाई २३ मार्च रोजी रात्री साडेनऊच्या सुमारास करण्यात आली.

हिमायतनगर तालुक्यातील पोटा येथे अवैध गुटखा साठवून ठेवल्याची माहिती हिमायतनगर ठाण्याचे पोलीस निरीक्षक अमोल भगत यांना मिळाली. त्यांनी आपल्या सहकाऱ्यांना त्या ठिकाणी पाठविले. सहाय्यक पोलीस निरीक्षक विशाल वाठोरे आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी २३ मार्च रोजी रात्री साडेनऊच्या सुमारास पोटा येथे शेख बाबा वालीसाब याच्या टीन पत्र्याच्या घरावर



कारवाई केली.

यावेळी पोलिसांनी त्याच्या घरातून जवळपास पाच लाख रुपयांचा विविध कंपनीचा गुटखा जप्त केला आहे. पोलिसांनी सय्यद सत्तार सय्यद खादर याला अटक केली आहे. या प्रकरणाची फिर्याद पोलीस हवालदार श्यामसुंदर नागरगोजे यांनी दिल्यानंतर हिमायतनगर पोलिसांनी सय्यद सत्तारविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

## मनपा महिला बालकल्याण समिती सभापतीपदी सदिच्छा सोनी तर उपसभापतीपदाचा निरंजना लांडगे यांनी घेतला पदभार

**नांदेड (प्रतिनिधी)**– महापालिकेच्या शिक्षण व महिला बालकल्याण समितीच्या सभापतीपदी सदिच्छा वैजू सोनी पाटील तर उपसभापतीपदी निरंजना राजू लांडगे यांची जिल्हाधिकारी तथा पिठासीन अधिकारी राहुल कर्डिले यांनी एका विशेष बैठकीत बिनविरोध निवड केली.

नुकत्याच झालेल्या महापालिकेच्या सर्वसाधारण सभेत शिक्षण व महिला बालकल्याण समितीच्या ११ सदस्यांची निवड करण्यात आली होती. शिक्षण व महिला बालकल्याण समितीच्या सदस्यांची बैठक मंगळवारी सकाळी अकरा वाजता आयोजित करण्यात आली होती. शिक्षण व महिला



बालकल्याण समितीच्या सभापतीपदासाठी भाजपच्या नगरसेविका सदिच्छा सोनी पाटील तर उपसभापती पदासाठी भाजपच्या नगरसेविका निरंजना लांडगे यांनी उमेदवारी अर्ज दाखल केले होते. सभापती व उपसभापतीपदासाठी प्रत्येकी एक अर्ज दाखल असल्याने पीठासीन अधिकारी राहुल कर्डिले यांनी सभापतीपदी सदिच्छा सोनी पाटील, उपसभापतीपदी निरंजना लांडगे यांची निवड जाहीर केली. या बैठकीला आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे, अतिरीक्त आयुक्त गिरीश कदम, नगरसचिव सरदार अजितपालसिंघ संधू यांच्यासह शिक्षण व महिला बालकल्याण समितीचे सदस्य उपस्थित होते. सभापती व उपसभापती यांचे महापौर कविता मुळे, सभागृह नेते ॲड. महेश कनकदंडे, स्थायी समितीचे सभापती विरेंद्रसिंघ गाडीवाले, नगरसेवक किशोर स्वामी, अभिषेक सौदे, मुन्ना अब्बास, साहेबराव गायकवाड, सत्यपाल सावंत, प्रवीण साले, महेश उर्फ बाळू खोमणे यांच्यासह अन्य नगरसेवकांनी व भाजपच्या पदाधिकाऱ्यांनी पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन केले.

## रूक्मिणीबाई कनकमवार यांचे निधन



**कुंडलवाडी (प्रतिनिधी)** –कुंडलवाडी येथील ज्येष्ठ नागरिक श्रीमती रुक्मिणीबाई इरन्ना कनकमवार यांचे दि. १५ मार्च रोजी रात्री ८:१५ वाजता वृद्धापकाळाने निधन झाले. कुटुंबवत्सल माता म्हणून त्यांची परिसरात ख्याती होती. त्या मातृभक्त पुत्र राजेश्वर इरन्ना कनकमवार (सेवानिवृत्त लिपीक) यांच्या मातोश्री होत. त्यांच्या पार्थिवावर दि. १६ मार्च रोजी दुपारी २ वाजता हरणाळी रोड स्मशानभूमी, कुंडलवाडी येथे अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत.

## श्रीमती राधाबाई रूद्रवार यांचे निधन



**नांदेड (प्रतिनिधी)** –येथील एचआयजी कॉलनी परिसरातील प्रतिष्ठित श्रीमती राधाबाई कृष्णा रूद्रवार (वय ७६ वर्षे) यांचे दि. २३ मार्च रोजी रात्री ११ वाजता वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पश्चात अरुण ऑईल इंडस्ट्री व गृहसेवा भांडार शिवाजीनगरचे संचालक अरुण, लक्ष्मीकांत व दीपक रूद्रवार अशी तीन मुले, सुना व नातवंडे असा परिवार आहे. त्यांच्या पार्थिवावर दि. २४ मार्च रोजी शांतीधाम गोवर्धनघाट येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

## एकतर्फी प्रेम करणारा मजनू कारागृहात; मैत्रिणीचा भाऊच घालत होता प्रेमाची साद, कुंडलवाडी ठाण्यात गुन्हा दाखल

**नांदेड (प्रतिनिधी)**– मैत्रिणीच्या भावाने एकतर्फी प्रेम करून प्रतिसाद मिळत नसल्याने अखेर पीडित युवतीच्या घरी जाऊन खंजरचा धाक दाखवून जिवे मारण्याची धमकी दिली. या प्रकरणातील मजनूला कुंडलवाडी पोलिसांनी अटक करून तत्काळ दोषारोपपत्र दाखल केले आणि या मजनूला सध्या नांदेडच्या कारागृहात पाठविण्यात आले आहे.

बिलोली पोलीस ठाण्याच्या हद्दीतील कुंडलवाडी पोलीस ठाण्यात २१ मार्च रोजी महाविद्यालयीन शिक्षण घेणारी पीडित मुलगी आपली तक्रार घेऊन पोहोचली. मैत्रिणीचा भाऊ हा कॉलेजला ने-आण करण्यासाठी दररोज दुचाकीवरून जात असे. यातूनच त्याने जवळीक साधण्याचा प्रयत्न केला. हा प्रकार जून २०२५ पासून २१ मार्च २०२६ पर्यंत सतत सुरू होता. मात्र त्याच्या एकतर्फी प्रेमाला पीडित मुलीने दाद दिली नाही. शेवटी संतप्त झालेल्या या मजनूने पीडितेचे घर गाठले. तेथे तिच्या आई-वडिलांना व तिला खंजरचा धाक दाखवून जिवे मारण्याची धमकी दिली. अखेर या सततच्या त्रासाला कंटाळून पीडितेने कुंडलवाडी पोलीस ठाण्यात आरोपी नरेश बजरंग जाधव (वय २५ रा. माष्टी ता. धर्माबाद) याच्याविरुद्ध तक्रार दिली. यावरून पोलिसांनी कलम ७४, ७५, ७६ सह पोक्सो अंतर्गत गुन्हा दाखल केला. या प्रकरणाचा तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक ज्ञानेश्वर शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली अंमलदार व्यंकट घोंगडे यांनी करून आरोपीला अटक केली.

## मुदखेड येथे आज रोजगार मेळाव्याचे आयोजन

**नांदेड (प्रतिनिधी)**– जिल्ह्यातील बेरोजगार उमेदवारांना रोजगाराची संधी उपलब्ध व्हावी यासाठी जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र नांदेड व बंदा बैरागी, बंदा सिंघजी बहादूर, शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने बुधवार दि. २५ मार्च २०२६ रोजी बंदा बैरागी, बंदा सिंघजी बहादूर, शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था मुदखेड येथे पंडित दीनदयाळ उपाध्याय प्लेसमेंट ड्राईव्ह/रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे.

## गीत रामायण कार्यक्रमाचे श्रीराम मंदिरात आयोजन

**नांदेड (प्रतिनिधी)** –श्रीराम जन्मोत्सवानिमित्त नांदेडच्या श्रीराम मंदिर यशवंतनगर येथे नांदेडचे सुप्रसिद्ध गायक पंडित संजय जोशी यांच्या गीत रामायण कार्यक्रमाचे बुधवार, दि. २५ मार्च रोजी सायंकाळी ७ वाजता आयोजन करण्यात आले आहे.



श्रीराम मंदिर यशवंतनगर येथील प्रांगणात नवे व जुने कलावंतासह ग. दि. मा. लिखित व पंडित सुधीर फडके अर्थात बाबूजी यांनी संगीतबद्ध केलेली अजरामर कलाकृती गीत रामायणचा ११८२ वा कार्यक्रम सादर होणार आहे.

या कार्यक्रमात त्यांच्या संचामध्ये सौ. सारिका चेतन पांडे या सहगायिका असून साथसंगत करणारे कलावंत डॉ. जगदीश देशमुख, चेतन पांडे (तबला), पं. पंकज शिरभाते, (व्हायोलीन), लक्ष्मीकांत जोशी धानोरकर (संवादिनी), भगवानराव देशमुख (सहवाद्ये), सौ. जयश्री आजेगावकर (सहगायन), कु. भक्ती जोशी (सहगायन) इत्यादी कलावंत असून गुणी युवा कलाकार डॉ. गुंजन शिरभाते ही प्रथमच या मंचावर व्हायोलिन साथसंगत करणार आहेत.

## बंदुकीचा धाक दाखवून व्यापाऱ्याला खंडणी मागितल्या प्रकरणी जीवन घोगरे यांच्यासह तीन जणांवर गुन्हा दाखल

**नांदेड (प्रतिनिधी)**– येथील व्यापारी शांतीलाल जैन यांना बंदुकीचा धाक दाखवून खंडणी मागितल्याप्रकरणी जीवन घोगरे पाटील यांच्यासह त्यांच्या अन्य साथीदारांवर न्यायालयाच्या आदेशाने सोमवार, दि. २३ रोजी वजिराबाद पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

शहरातील बाफना परिसरात वास्तव्यास असलेले व्यावसायिक शांतीलाल मोतीलाल जैन यांनी नागपूर येथील अवैध सावकारी (फायनान्स) चा व्यवसाय करणाऱ्या आरोपी प्रेमचंद भरुट यांच्याकडून व्यवसायासाठी क्षुल्लक रक्कम घेतली होती. त्यांनी या रक्कमेपोटी मोठ्या प्रमाणात व्याज आकारणी केल्याने व्यापारी शांतीलाल जैन यांनी त्याच्या विरुद्ध शिवाजीनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला होता. याच रागातून आरोपी आनंद प्रेमचंद भरुट याने जीवन आबाजीराव घोगरे यास शांतीलाल जैन व त्यांच्या कुटुंबियांना त्रास देऊन प्रापर्टी हडप करण्याची सुपारी दिली.

आरोपी भरुट याच्या सांगण्यावरून आरोपी जीवन आबाजीराव घोगरे व त्यांच्या अन्य साथीदारांनी मुद्रांक विक्रेता विजय गायकवाड यांच्याकडून घेतलेल्या मुद्रांकावर खोटे भाडेपत्र तयार केले. ते खरे असल्याचे भासवत १७ लाख रुपयांचा खर्च दाखवला. आरोपी आनंद भरुट याने चार आरोपींसह व्यापारी शांतीलाल जैन यांना बंदुकीचा धाक दाखवत जीवे मारण्याची धमकी दिली. या घटनेसंदर्भात व्यापारी जैन यांची पत्नी जयश्री शांतीलाल जैन यांनी वजिराबाद पोलीस ठाण्यात तक्रार दिली. परंतु वजिराबाद पोलिसांनी त्यांची तक्रार घेतली नव्हती. त्यानंतर जयश्री जैन यांनी या प्रकरणात न्यायालयात दाद मागितली. न्यायमूर्ती ए. जी. चव्हाण यांच्यासमोर प्रकरणाची सुनावणी झाली. न्यायमूर्तींनी आरोपी आनंद भरुट, जीवन घोगरे, सिध्दार्थ भोकरे, संदीप नवघडे यांच्यासह इतर चार जणांविरध्द गुन्हा दाखल करण्याचे आदेश दिले आहेत. यावरुन वजिराबाद पोलीस ठाण्यात गुरनं. १२७/२०२६ अन्वये कलम ३०८, २२८ (ब), ३१८, ३३६, ३३७, ३३८, ११९, ३(५) बीएनएसप्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणाचा तपास सहायक पोलीस निरीक्षक उमाकांत पुणे करत आहेत.

## श्रीराम जन्मोत्सवानिमित्त दुचाकी रॅली; वजिराबाद ते अशोकनगरपर्यंत भगव्या ध्वजांनी सजणार मार्ग

### विश्व हिंदू परिषद, बजरंग दल व दुर्गा वाहिनीचा पुढाकार

**नांदेड (प्रतिनिधी)**– श्रीराम जन्मोत्सवाच्या पार्श्वभूमीवर नांदेड शहरात धार्मिक उत्साहाचे वातावरण निर्माण झाले असून, या निमित्ताने बजरंग दल, विश्व हिंदू परिषद, मातृशक्ती व दुर्गा वाहिनी यांच्या संयुक्त विद्यमाने दुचाकी रॅलीचे आयोजन करण्यात आले आहे. गुरुवारी दि. २६ मार्च रोजी सकाळी ८.३० वाजता ही रॅली निघणार असून, शहरातील विविध भागांतून हजारो दुचाकीस्वार या रॅलीत सहभागी होणार असल्याची माहिती आयोजकांनी दिली आहे.

शहरातील श्री पंचवटी हनुमान मंदिर, वजिराबाद येथून रॅलीला सुरुवात होणार असून, महावीर चौक मार्गे प्रमुख मार्गांवरून संचलन करत श्रीराम मंदिर, अशोकनगर येथे रॅलीचा समारोप होणार आहे. रॅलीदरम्यान संपूर्ण मार्ग भगव्या ध्वजांनी सजविण्यात येणार असून, जय श्रीरामच्या घोषणांनी वातावरण दुमदुमणार आहे. फलक आणि घोषवाक्यांच्या माध्यमातून धार्मिक संदेश देण्यात येणार आहे. या दुचाकी रॅलीसाठी आयोजकांकडून व्यापक नियोजन करण्यात आले आहे. सहभागी दुचाकीस्वारांनी शिस्त राखत रॅलीत सहभागी व्हावे आणि वाहतूक नियमांचे काटेकोर पालन करावे, अशा सूचना देण्यात आल्या आहेत. रॅलीदरम्यान कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी स्वयंसेवकांची नियुक्ती करण्यात आली असून, मार्गावर विविध ठिकाणी नियंत्रण पथके तैनात राहणार आहेत. पोलीस प्रशासनाशी समन्वय साधून वाहतूक व्यवस्था सुरळीत ठेवण्यासाठी विशेष नियोजन करण्यात आले आहे.

### दुचाकी फेरीचा निश्चित मार्ग जाहीर

पंचवटी हनुमान मंदिर येथून सुरू होणारी दुचाकी फेरी वजिराबाद चौरस्ता, शिवतीर्थ, चिखलवाडी मार्गे पुढे जाणार आहे. त्यानंतर अण्णाभाऊ साठे चौक, वसंतराव नाईक चौक, आनंदनगर आणि भाग्यनगर या प्रमुख भागांतून फेरी काढण्यात येईल. शेवटी श्रीराम मंदिर, अशोकनगर येथे फेरीचा समारोप होणार आहे. या मार्गावर वाहतूक व्यवस्थेबाबत आवश्यक ती खबरदारी घेण्यात येणार असल्याची माहिती देण्यात आली आहे.

### अयोध्येतील श्रीराम मूर्तीची प्रतिकृती ठरणार मुख्य आकर्षण

श्रीराम जन्मोत्सवाच्या दुचाकी फेरीत अयोध्या येथील श्रीरामाची सुमारे आठ फुटांची भव्य प्रतिकृती प्रमुख आकर्षण ठरणार आहे. रॅलीदरम्यान ही मूर्ती विशेष रथावरून दर्शनासाठी ठेवण्यात येणार असून, भाविकांना आकर्षित करणार आहे. श्रीरामाच्या जयघोषात या मूर्तीचे स्वागत करण्याची तयारी आयोजकांकडून सुरू आहे. या भव्य मूर्तीमुळे फेरीला अधिक धार्मिक आणि उत्सवी स्वरूप प्राप्त होणार आहे.


**Godateer Samachar** हे पत्र गोदातीर मीडिया नेटवर्ककरिता मुद्रक, प्रकाशक, संपादक केशव मधुकरराव घोणसे पाटील यांनी सेवा कम्युनिकेशन, १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे मुद्रित करुन १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे प्रकाशित केले. **संपादक** केशव मधुकरराव घोणसे पाटील.

फोन नं.(०२४६२) २५५७७७/फॅक्स नांदेड-(०२४६२) २५२२११ / लातूर (०२३८२)२५७४७४ / मुंबई ९९६७०६२३५४ ईमेल: godateer@gmail.com, keshavgpatil@gmail.com